सत्यमेव जयते

# "धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तदर्थ संयुक्त समिती (२०२०-२०२१)

# (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**"मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना (ज्यात शुश्रुषालय, प्रसुतिगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो) शासनातर्फे देण्यात आलेली सवलत, मदत, सूट, माफी इत्यादी आणि या रुग्णालयांमार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादींसाठी करण्यात येणारा खर्च या संदर्भात सखोल तपासणी करून शासनास शिफारशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी २०१६ रोजी पुणे येथे दिलेल्या भेटी संदर्भातील" अहवाल.**

**(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी सादर करण्यात आला)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
विधानभवन, मुंबई
मार्च, २०२२

# “धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे” या संदर्भातील तदर्थ संयुक्त समिती (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**“मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना (ज्यात शुश्रुषालय, प्रसुतिगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो) शासनातर्फे देण्यात आलेली सवलत, मदत, सूट, माफी इत्यादी आणि या रुग्णालयांमार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादींसाठी करण्यात येणारा खर्च या संदर्भात सखोल तपासणी करून शासनास शिफारशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी २०१६ रोजी पुणे येथे दिलेल्या भेटी संदर्भातील अहवाल”**

## "धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तदर्थ संयुक्त समिती (२०२०-२०२१)

**समिती प्रमुख :**

(१) श्रीमती आदिती तटकरे, मा. विधि व न्याय राज्यमंत्री

**सदस्य :**

(२) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स

(३) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स

(४) श्री. अजय चौधरी, वि.स.स

(५) श्री. रमेश लटके, वि.स.स

(६) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स

(७) ॲड. अशोक पवार, वि.स.स

(८) डॉ. किरण लहामटे, वि.स.स

(९) श्री. धीरज देशमुख, वि.स.स

(१०) श्री. राजू पारवे, वि.स.स

* (११) रिक्त

(१२) श्री. अतुल सावे, वि.स.स

(१३) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स

(१४) श्री. बबनराव पाचपुते, वि.स.स

(१५) श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले, वि.स.स

(१६) डॉ. राहूल आहेर, वि.स.स

(१७) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स

(१८) श्री. राहुल कुल, वि.स.स

(१९) श्री. प्रमोद पाटील, वि.स.स

(२०) श्री. अबू आजमी, वि.स.स

(२१) श्री. विप्लव बाजोरिया, वि.प.स

(२२) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स

(२३) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स

(२४) डॉ. रणजित पाटील, वि.प.स

(२५) श्री. प्रविण पोटे पाटील, वि.प.स

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. विनायक मेटे, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
उप सचिव (विधि पदाचा अतिरिक्त कार्यभार)

(३) श्री. सुनिल परब, कक्ष अधिकारी

**टिप.—***श्री. चंद्रकांत जाधव, वि.स.स. यांचे दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी निधान झाल्यामुळे.

## “धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे” या संदर्भातील तदर्थ संयुक्त समिती (२०१७-२०१८)

**समिती प्रमुख :**

(१) डॉ. रणजित पाटील, मा. विधि व न्याय राज्यमंत्री

**सदस्य :**

(२) डॉ. विजयकुमार गावित, वि.स.स.

(३) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

(४) डॉ. मिलिंद माने, वि.स.स.

(५) श्री. संजय सावकारे, वि.स.स

(६) डॉ. संजय कुटे, वि.स.स.

(७) ॲड. राज पुरोहित, वि.स.स.

(८) श्री. समीर मेघे, वि.स.स.

(९) डॉ. राहुल आहेर, वि.स.स.

(१०) श्री. जगदीश मुळक, वि.स.स.

(११) श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स.

(१२) डॉ. शशिकांत खेडेकर, वि.स.स.

(१३) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.

(१४) श्री. अशोक पाटील, वि.स.स.

(१५) श्री. शेख आसिफ शेख रसीद, वि.स.स.

(१६) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(१७) श्री. डी. पी. सावंत, वि.स.स.

(१८) श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१९) डॉ. सतीश पाटील, वि.स.स.

(२०) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स.

(२१) डॉ. अपूर्व हिरे, वि.प.स.

(२२) डॉ. परिणय फुके, वि.प.स.

(२३) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.

**विशेष निमंत्रीत :**

(२६) श्री. सत्येज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. अशोक मोहिते, सहसचिव (१)

(३) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(४) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

## “धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे” या संदर्भातील तदर्थ संयुक्त समिती (२०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

(१) डॉ. रणजीत पाटील, मा. विधि व न्याय राज्यमंत्री

**सदस्य :**

(२) डॉ. विजयकुमार गावित, वि.स.स.

(३) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

(४) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(५) श्री. राम कदम, वि.स.स.

(६) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(७) डॉ. राहुल आहेर ,वि.स.स

(८) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(९) डॉ. मिलिंद माने,वि.स.स.

(१०) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

(११) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१२) डॉ. बालाजी किणीकर,वि.स.स

(१३) डॉ. शशिकांत खेडेकर, वि.स.स.

(१४) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

(१५) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१६) श्री. डी.पी. सावंत, वि.स.स.

(१७) श्री. अमिन पटेल, वि.स.स.

(१८) डॉ. सतिश पाटील, वि.स.स.

(१९) श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स.

(२०) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स.

(२१) डॉ. अपूर्व हिरे, वि.प.स.

(२२) श्री. प्रकाश बिनसाळे, वि.प.स.

(२३) श्री. मुझफ्फर हुसेन, वि.प.स.

(२४) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. अशोक मोहिते, सहसचिव (१)

(३) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(४) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | (नऊ) |
| २. | अहवाल | १ |
| ३. | समितीचे अभिप्राय व शिफारशी | १९ |
| ४. | **परिशिष्ट-१** (समितीच्या बैठकींचा तपशील) | २१ |
| ५. | **परिशिष्ट-२** (विधि व न्याय विभागाकडून धर्मादाय रुग्णालयांबाबतची अद्ययावत माहिती पुस्तिका) | २६ |

## प्रस्तावना

मी, **"धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीचा** समिती प्रमुख या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजीच्या बैठकीत तदर्थ समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी पुणे येथे धर्मादाय रुग्णालयांना भेटी देण्यासंदर्भात समितीचा दौरा करण्याचे निश्चित केले.

सदरहू बाबींच्या अनुषंगाने समितीच्या एकूण ३ बैठका घेण्यात आल्या. सदरहू प्रकरणी **"मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना (ज्यात शुश्रुषालय, प्रसूतिगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो) शासनातर्फे देण्यात आलेली सवलत, मदत, सूट, माफी, इत्यादी आणि या रुग्णालयांमार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादींसाठी करण्यात येणारा खर्च या संदर्भात सखोल तपासणी करून शासनास शिफारशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या तदर्थ** समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी पुणे येथील विविध धर्मादाय रुग्णालयांना दिलेल्या भेटी संदर्भातील व साक्षीच्या माध्यमातून विभागीय प्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या लेखी व मौखिक माहितीच्या आधारे या सर्व प्रकरणाची सखोल छाननी करून समितीने आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात नमूद केल्या आहेत. विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती पुरविली व समितीच्या कामकाजात सहाय्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व तो संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ७ मार्च २०२२.

**श्रीमती आदिती तटकरे,**
मा. विधि व न्याय राज्यमंत्री तथा
समिती प्रमुख.

## अहवाल

**"धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे"** या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी पुणे जिल्ह्यातील जहांगीर, रुबी, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, सह्याद्री, संचेती, केईएम व इनल्याक्स अँड बुधराणी या धर्मादाय खाजगी रुग्णालयाला भेटी दिल्या. समितीने जहांगीर नर्सिंग होमला भेट दिली असता सदर भेटी दरम्यान रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत उपचार होतो यासंदर्भातील फलक आढळून आलेला नाही. सदर फलक बाहेरच्या बाजूला छोट्या आकारात लावण्यात आला होता. डिजीटल फलक प्रतिक्षा कक्षामध्ये लावणे आवश्यक असताना प्रतिक्षा कक्षामध्ये सुद्धा डिजीटल फलक लावण्यात आलेला नव्हता. यानंतर समितीने रुग्ण आय.पी.एफ. किंवा इ.डब्ल्यू.एस.चा असल्याची माहिती तसेच त्याचे नाव बेडवर लावण्यात यावे व या रुग्णांकडून कोणत्याही प्रकारची अनामत रक्कम घेऊ नये अशी सूचना केली असता जहांगीर नर्सिंग होमचे जनरल मॅनेजर यांनी आय.पी.एफ. आणि इ.सी.डब्ल्यू. रुग्णांवर आतापर्यंत किती खर्च केला गेला याची समितीला माहिती उपलब्ध करून दिली. रुग्णालयातील आय.पी.एस. अंतर्गत दाखल केलेल्या रुग्णांची चौकशी केली असता त्यांनी त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात येत असल्याचे सांगितले. आय.पी.एफ.च्या रुग्णाकडून एक पैसा देखील घेतला जात नाही. तसेच रुग्णालयाचा धर्मादाय खाजगी रुग्णालयाचा निधी वजा (मायनसमध्ये) असून डिसेंबर, २०१५ मध्ये ६१ रुग्णांवर उपचार करण्यात आले त्यामध्ये आय.पी.एफ.च्या १६ रुग्णांचा समावेश आहे. धर्मादाय रुग्णालयाचे खाते वजामध्ये आहे. कार्डीओलॉजी आणि न्युरो सर्जरीचे चार्जेस जास्त असल्यामुळे कमी रुग्णावर जास्त खर्च होतो. रुग्णालयात सिलिंग लावले जात नाही. आय.पी.एफ.च्या रुग्णाकडून कोणत्याही प्रकारचे चार्जेस घेतले जात नाही, फक्त दाखल करण्याच्यावेळी केवळ एक रुपया चार्ज घेतला जातो. सामान्य रुग्णांप्रमाणेच आय.पी.एफ.च्या रुग्णांवर उपचार केले जातात. या विषयाच्या संदर्भात विभागीय प्रतिनिधी यांनी अशी माहिती दिली की, रुग्णालयात डमी रुग्ण पाठवून रँडमली व्यवस्था तपास करीत असते. समितीला रुग्णालयाच्या प्रतिनिधी यांनी अशी माहिती दिली की, मधुमेहाच्या लहान मुलांवर उपचार करतो तसेच स्तनदा मातांना त्यांचा आहार शिजवून देतो. यासंदर्भातील सर्व अभ्यास पूर्ण झाल्यानंतर माहिती शासनासमोर मांडणार आहोत. शासनाकडून कोणती सुट घेत नाही परंतु आता विजेचे देयक महिन्याकाठी ५० लाख रुपये येत असल्यामुळे वीज देयकात तसेच पाणी पट्टीमध्ये सुट मिळावी अशी समितीकडे मागणी केली असता यासंदर्भात आपल्या विनंतीचा निश्चितपणे विचार केला जाईल असे आश्वासन समितीने दिले.

त्यानंतर समितीने रुबी रुग्णालयास भेट दिली व रुग्णांशी चर्चा केली. त्यादरम्यान समितीने रुग्णालय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले की, एका रुग्णाकडे केशरी रंगाचे रेशनकार्ड असल्यामुळे त्याच्यावर मोफत उपचार करावेत असे पत्र त्यांच्या रुग्णालयास दिले होते तरी देखील त्याला रुग्णालयात दाखल करून घेण्यात आले नाही. दुसरे रुग्ण श्री. दीपक भुजबळ यांच्या नातेवाईकांकडून रुग्णालयात १० हजार रुपये आगाऊ रक्कम म्हणून घेतले. या रुग्णास त्याची आई किडनी देणार आहे. त्यांचे वार्षिक उत्पन्न २० हजार आहे. तिसरे रुग्ण श्रीमती नीलम काळभारे यांचे वार्षिक उत्पन्न ८० हजार असल्यामुळे ते ५० टक्के उपचारामध्ये बसत आहेत. श्री. प्रसाद मोरे यांना ब्रेन हॅमरेज झाला असून त्यांना योजनेमध्ये समाविष्ट केलेले आहे. परंतु त्यांना ससून रुग्णालयामध्ये स्थलांतर करण्यास सांगितलेले आहे. त्यावर रुग्णालयाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, सदर रुग्णावर १५ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांच्यावर आय.पी.एफ. अंतर्गत किती खर्च करायचा असाही प्रश्न आहे.

निर्धन आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा रिक्त असल्याचे समितीला दिसून आले. समितीने काही रुग्णांकडे चौकशी केली असता समितीला अशी माहिती मिळाली की, या योजनेंतर्गत सवलत घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांकडे बँकेचे विवरणपत्र, रुग्णाकडे किती जमीन आहे, घरातील व्यक्ती कुठे नोकरीस आहेत इत्यादी माहिती घेण्यात येते. त्यावर समितीने रुग्णालयास असे सांगितले की, रुग्णांकडे केशरी किंवा पिवळ्या रंगाचे रेशनकार्ड आहे काय एवढाच प्रश्न रुग्णालयाने विचारावयाचा आहे. त्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही माहिती रुग्णांकडून घेण्याची आवश्यकता नाही. आय.पी.एफ. योजनेची माहिती देणारे कार्यालय तळमजल्यावर दिसून आले नाही. त्यावर तेथील अधिकाऱ्यांनी सांगितले की, सदरहू ऑफीस तिसऱ्या मजल्यावर आहे. त्यावर समितीने सदर ऑफीस तळ मजल्यावर असणे आवश्यक आहे. कारण रुग्णांच्या नातेवाईकांना आय.पी.एफ. योजनेंतर्गत उपचार घ्यावयाचे असल्यास त्यासंबंधीचे कार्यालय तिसऱ्या मजल्यावर आहे हे त्यांना कसे समजणार. आपण फक्त दर्शनी भागावर फलक लावून उपयोगाचे नाही तर या योजनेची माहिती देणारे कार्यालयही तळमजल्यावर असावे जेणेकरून लोकांना माहिती घेणे सुलभ होईल असे निदेश दिले. निर्धन आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखून ठेवलेल्या खाटांपैकी अनेक खाटा रिक्त आहेत व या योजनेंतर्गत आय.पी.एफ. खात्यामध्ये ७ कोटी रुपये शिल्लक असल्याचे समितीस दिसून आले याचा अर्थ आपण सवलत घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांच्या बाबतीत कठोर निर्णय घेऊन त्यांना सुविधा नाकारत असणार असे समितीने विचारल्यावर रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, रुग्णांकडे चौकशी केल्यावर त्यांच्याकडे २० एकर, १५ एकर जमीन असल्याचे दिसून आले आणि अशा लोकांकडे केशरी रंगाचे रेशनकार्ड असतात. त्यावर समितीने निर्देश दिले की, आपण शासनाने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असून आपण अन्य बाबींची चौकशी करु नये.

आपल्या रुग्णालयात एखादा अपघातग्रस्त रुग्ण आल्यास आपण त्याच्यावर प्रथम उपचार केले पाहिजेत. समितीकडे अशी तक्रार आहे की, आपण अशा रुग्णांवर लगेच उपचार करीत नाहीत, त्यांना आगाऊ रक्कम भरण्यास सांगितले जाते. श्री. मारोती डांगे यांचा दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी अपघात होऊन त्याच्या डोक्याला मार लागल्यामुळे डोक्यात रक्त साचले होते. रुग्णाच्या नातेवाईकांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर सायंकाळी ८.३० वाजता त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्यानंतर दोन दिवसानंतर तो रुग्ण दगावला. त्यावर रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, अपघातग्रस्त रुग्ण दाखल झाल्यास आम्ही त्याच्यावर प्रथम उपचार करतो.

समितीने काही रुग्णांच्या नातेवाईकांशी चर्चा केली असता केशरी रेशनकार्ड असलेल्या रुग्णांकडून देखील पैसे घेतल्याचे आढळून आले. त्यावर रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, श्री. दीपक भुजबळ हा रुग्ण एम.आय.डी.सी. मध्ये काम करीत असून त्याला महिन्याला ८ व त्याच्या वडिलांना ५-६ हजार रुपये पगार असल्यामुळे ते निर्धन योजनेत बसत नाही. परंतु त्यांच्याकडे केशरी रंगाचे रेशनकार्ड असताना आपण त्यांच्याकडे आगाऊ रकमेची मागणी केली. आपण नियमाप्रमाणे फक्त उत्पन्नाचा दाखला आणि पिवळे किंवा केशरी रंगाचे रेशनकार्ड आहे काय एवढीच चौकशी करावयाची आहे. त्यावर रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, आमच्याकडून चूक झाली असून रुग्णाचे दहा हजार रुपये परत करण्यात येतील.

समितीकडे अशीही तक्रार प्राप्त झाली आहे की, आय.पी.एफ. रुग्णांच्या नस्तीवर फोलिओ असा शेरा असल्यामुळे त्यांना औषधोपचार देण्यात येत नाही. फोलिओ म्हणजे काय अशी समितीने विचारणा केली असता फोलिओ याचा

अर्थ अनामत रक्कम संपणे असा आहे. आय.पी.एफ. रुग्णांना फोलिओ लागू होत नाही. असे असतानाही श्रीमती कलावती सपकाळ, श्री. ऋतिक कांबळे, श्रीमती यमुना गाडे या आय.पी.एफ. रुग्णांचे औषधोपचार थांबविण्यात आल्याच्या तक्रारी समितीकडे आहेत. त्यावर रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, फोलिओ योजना फक्त पैसे भरणाऱ्या रुग्णांसाठी आहे, आय.पी.एफ. रुग्णांसाठी नाही.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना दहा ठिकाणी फिरावे लागते, त्यांना नीट माहिती दिली जात नाही. तेव्हा समितीने रुग्णालयास सूचना केली की, या योजनेंतर्गत लाभ घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांना माहिती देणारे व त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्याची जागा एकाच ठिकाणी असावी जेणेकरून रुग्णांच्या नातेवाईकांना त्रास होणार नाही.

नियमाप्रमाणे धर्मादाय रूग्णालयांनी एकूण रुग्णांच्या देयकाच्या दोन टक्के रक्कम प्रत्येक महिन्याला निर्धन रुग्ण निधी खात्यामध्ये जमा करणे आवश्यक असून त्याचे वेगळे खाते असावे. त्यावर समितीला सांगण्यात आले की, निर्धन रुग्णांचे निधी खाते वेगळे नाही, यापुढे वेगळे खाते असणे आवश्यक आहे असे समितीने सांगितले असता रुग्णालय प्रतिनिधींनी असे सांगितले की, निर्धन रुग्णांचे निधी खाते वेगळे नाही, यापुढे वेगळे खाते करण्यात येईल. निर्धन रुग्णांच्या निधी खात्यामध्ये ७ कोटी रुपये जमा आहेत, ही रक्कम तशी मोठी आहे. तेव्हा याची वेगळ्या समितीमार्फत चौकशी करावी असे समितीने सांगितले. तसेच याचे वेगळे खाते करताना ७ कोटी रुपये कोणत्या तारखेपासून शिल्लक आहेत त्या तारखेपासून मिळणाऱ्या व्याजाची रक्कम देखील आयपीएफ अकाऊन्टमध्ये जमा करावी. आय.पी.एफ. रुग्णांवर दर महिन्याला ६० ते ७० लाख रुपये खर्च करण्यात येतो असे रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी समितीला सांगितले. या योजनेची जनजागृती करण्याची आवश्यकता असून या योजनेबद्दल लोकांना अजून फारशी माहिती झालेली नाही. त्यासाठी वर्तमानपत्रात माहिती देऊन जगजागृती करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने सांगितले.

रुग्णालयाच्या शासनाकडून कोणत्या अपेक्षा आहेत अशी समितीने विचारणा केली असता रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, रुग्णांकडे १५-२० वर्षापूर्वीची रेशनकार्ड असतात. तेव्हाच्या उत्पन्नामध्ये आणि आताच्या उत्पन्नामध्ये निश्चितपणे वाढ झाली असणार, तेव्हा यामध्ये बदल करावा अशी विनंती आहे. त्यावर समितीने असे सांगितले की, दुर्बल घटकातील लाभार्थ्यांची यादी नव्याने करण्याबाबतचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आलेला आहे. त्यानंतर रुग्णालयाच्या प्रतिनिधी यांनी आय.पी.एफ. मधील काही रुग्ण तीन-तीन महिने व्हेन्टीलेटरवर असतात अशा रुग्णांना कितपत सेवा द्यायची व काही रुग्णांचे नातेवाईक दादागिरी करतात त्याबाबत देखील विचार व्हावा असे रुग्णालयाच्या प्रतिनिधींनी सांगितले असता समितीने याबाबत एका रुग्णावर किती कालावधीमध्ये आणि किती रकमेपर्यंत उपचार करावेत याबाबत निर्णय घ्यावा लागेल असे सांगितले.

त्यानंतर समितीने दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, पुणे येथे भेट दिली असता, रुग्णालयाच्या प्रवेश द्वारावर गरीब आणि दुर्बल घटकातील रुग्णावर करण्यात येणाऱ्या उपचारांबाबतचा फलक लावला होता. तसेच रुग्णालयाचे स्वतंत्र धर्मादाय कार्यालय (चॅरिटी ऑफीस) असल्याने समितीने याबाबत समाधान व्यक्त केले. त्यानंतर समितीने रुग्णालयात आयपीएफ आणि इडब्ल्यूएस अंतर्गत दाखल असलेल्या रुग्णाची चौकशी केली असता सर्व रुग्णांनी रुग्णालयाची सेवा अतिशय चांगली असल्याचे सांगितले. तसेच या रुग्णालयात आगाऊ रक्कम न घेता रुग्णांवर उपचार करण्यात येतो. एप्रिल ते डिसेंबर, २०१५ पर्यंत रुग्णालयाने २९० आयपीएफ व ४२५ इडब्ल्यूएस

च्या रुग्णावर उपचार केले आहेत. एका महिन्यात आयपीएफ आणि इडब्ल्यूएस च्या रुग्णावर ४५ लक्ष ३ हजार ६२७ रुपये खर्च झाला असून डिसेंबर, २०१५ पर्यंत रुग्णालय मायनस ६२ लाखापर्यंत आले आहे. आयपीएफ चे खाते लवकरच उघडणार आहोत, असे समितीला सांगण्यात आले. त्यावेळी समितीने श्री. सौंदणकर या ७० वर्षे वयाच्या रुग्णाची विचारपूस केली असता रुग्णालयाच्या प्रतिनिधींनी समितीला अशी माहिती दिली की, या रुग्णाला अर्धांगवायू झाला असून रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णाला दवाखान्यात दाखल केले परंतु दाखल केल्यानंतर या रुग्णाचे नातेवाईक गायब झाले आहेत. यासंदर्भात समितीने रुग्णाच्या मुला-मुलीवर गुन्हा दाखल करण्याची सूचना केली. यानंतर समितीने असे निदेश दिले की, रुग्ण आजारी पडल्यावर रुग्णाच्या नातेवाईकांची धांदल उडत असते. अशावेळी रेशनकार्ड किंवा उत्पन्नाचा दाखला आणण्याचे भान त्यांना राहत नाही. त्यामुळे रुग्णाला दाखल केल्यानंतर दोन तीन दिवसांनी रुग्णांच्या नातेवाईकाकडून कागदपत्राची पुर्तता करून घ्यावी.

यानंतर समितीने सह्याद्री हॉस्पिटलला भेट दिली असता, निर्धन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना या योजनेबाबतची माहिती देणारा फलक दर्शनी भागात लावलेला नव्हता. सदर फलक दर्शनी भागात लावण्याबाबत समितीने सूचना तसेच रुग्णालयातील रुग्णांची विचारपूस केली. रुग्णालयातील खाटांवर आयपीएफ चे रुग्ण व इडब्ल्यूएसचे रुग्ण असा उल्लेख केल्याचे निदर्शनास आले. तसेच सदर रुग्णालय हे ५८ लाख रुपये इतके मायनसमध्ये असल्याचे रुग्णालय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यानंतर समितीने संचेती हॉस्पिटल, पुणे येथे भेट दिली असता रुग्णालयाने प्रवेशद्वारावर गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत उपचाराच्या संदर्भातील मोठ्या आकारातील फलक न लावता तो त्यांनी मागच्या बाजूला लावला असल्याचे समितीस आढळून आले. समितीला हॉस्पिटलमध्ये डिजिटल फलक कोठेही आढळून आला नाही. तसेच हॉस्पिटलचे समाजसेवक श्री. राजू यशवंत पवार हे माहिती देण्यासाठी उपस्थित नव्हते.

यानंतर समितीने वॉर्डमधील रुग्ण श्री. बाळू दिगंबर थोरात यांची विचारपूस केली असता रुग्णाच्या नातेवाईकांनी अशी माहिती दिली की, या आय.पी.एफ.मध्ये उपचार मिळावा यासाठी ते गेल्या सहा महिन्यापासून हॉस्पिटलमध्ये ये-जा करीत होते. त्यानंतर त्यांनी धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर आयुक्तांच्या सांगण्यावरुन रुग्णाला संचेती हॉस्पिटलमध्ये दाखल करून घेण्यात आले. या हॉस्पिटलमध्ये अगोदर सामान्य रुग्ण म्हणून एक लाख रुपये खर्च करून रुग्णाच्या पायात रॉड टाकला होता. परंतु आता त्याचा त्रास होत आहे. त्यावेळी नातेवाईकांकडून पैसे गोळा करून शस्त्रक्रियेसाठी पैसे उभे केले होते परंतु आता आर्थिक परिस्थिती बरी नसल्यामुळे रक्कम खर्च करणे शक्य नव्हते. परंतु आता या हॉस्पिटलमध्ये आय.पी.एफ.ची सुविधा नसल्याचे कारण देऊन दाखल करून घेण्यास नकार देत होते. या दवाखान्यात धर्मादाय सह आयुक्तांमुळेच रुग्णाला दाखल केले असून दाखल होतेवेळी त्यांच्याकडून १५ हजार रुपये घेण्यात आलेले आहे. यानंतर धर्मादाय सह आयुक्तांनी रुग्णाने जेवढे पैसे भरले आहेत ते संपूर्ण पैसे त्याला परत देण्यात यावे तसेच रुग्णाने बाहेरुन औषधे आणली तर त्याचे देयक सुद्धा आय.पी.एफ.च्या खात्यामध्ये टाकून ते पैसे देखील रुग्णास परत करण्यात यावे असे आदेश समितीने दिल्यानंतर संचेती रुग्णालयाच्या प्रतिनिधी यांनी रुग्णाचे सर्व पैसे उद्या दिले जातील असे सांगितले. समितीने रुग्णालयाच्या कामकाजासंदर्भात नाराजी व्यक्त केली तसेच आपल्या रुग्णालयात आय.पी.एफ.चे रुग्ण का नाही तसेच आपल्या हॉस्पिटलमध्ये आय.पी.एफ.चे ७८ लक्ष रुपये अधिकमध्ये का पडून आहेत असे विचारुन रुग्णाला दाखल करून

घेण्यात यावे यासाठी रुग्णाचे नातेवाईक आपल्या दवाखान्यात सहा महिन्यापासून ये-जा करीत आहेत. परंतु तरी देखील त्यांना आय.पी.एफ.मध्ये दाखल करून न घेतल्यामुळे रुग्णाच्या नातेवाईकाला शेवटी धर्मादाय सह आयुक्तांकडे जावे लागले. अशा पद्धतीने आपल्या हॉस्पिटलचे काम चालत राहणार असेल तर ते योग्य होणार नाही. रुग्णाला भरती केल्यानंतर त्याच्याकडून १० हजार रुपये घेण्यात आले ते ही बरोबर नाही. रुग्णाने केशरी रेशन कार्ड तसेच उत्पन्नाचा दाखला दिलेला असतानाही रुग्णालय रुग्णाकडून १५ हजार रुपये घेते हे योग्य नाही. त्यामुळे रुग्णाकडून जे १० हजार रुपये घेण्यात आले आहेत ते त्वरीत परत करण्यात यावे असे सांगितले. तसेच पुण्यामध्ये अपघाताचे प्रमाण जास्त असून देखील आपल्या दवाखान्यात रुग्णांना दाखल करून घेतले जात नाही तसेच आय.पी.एफ.च्या रुग्णांकडून औषधांचे पैसे घेतले जातात असेही निदर्शनास आलेले आहे. आपल्याकडे औषधे उपलब्ध नसतील तर अशा वेळी रुग्णाने बाहेरुन औषधे आणली तर ती औषधे आय.पी.एफ.च्या खात्यामध्ये टाकून त्यांचे पैसे रुग्णाला परत केले पाहिजे. तसेच आपल्याला या योजनेची कोणतीही संचेती रुग्णालय, पुणे यांना माहिती नसल्याचे किंवा माहिती असून माहिती नसल्याचे आपण दाखवित असल्याचे दिसून येते या सर्व बाबी विचारात घेता समितीने धर्मादाय रुग्णालयांच्या संदर्भात होणाऱ्या बैठकीमध्ये गेल्या ३ वर्षाचे रेकॉर्ड समितीला उपलब्ध करून देण्याबाबत सांगितले असता, रुग्णालयाच्या चेअरमन यांनी अशी माहिती दिली की, ते रुग्णाला कधीही परत पाठवित नाही. परंतु श्री. थोरात या रुग्णावर आय.पी.एफ. खाली जी शस्त्रक्रिया करावयाची आहे त्याची या हॉस्पिटलमध्ये सोय नसल्यामुळे अडचण निर्माण झालेली आहे. आय.पी.एफ.च्या रुग्णांचा सर्व तपशील उद्याच्या बैठकीत सादर करण्यात येईल. यानंतर समितीने गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत उपचाराच्या संदर्भातील मोठ्या आकारातील फलक लावण्यात यावा तसेच प्रत्येक वॉर्डमध्ये डिजिटल फलक लावण्यात यावा, बेडच्या वरच्या बाजूला रुग्ण आय.पी.एफ. मधील आहे की, इ.डब्ल्यू.एस. मधील आहे याचा छोट्या आकारातील फलक लावण्यात यावा. तसेच आय.पी.एफ. रुग्णांकडून भरती होते वेळी कोणत्याही प्रकारचा आकार आकारु नये, रुग्णांकडे केशरी रेशनकार्ड किंवा तहसीलदाराचा उत्पन्नाच्या दाखल्यापैकी एकाच कागदपत्राची मागणी करावी. रुग्णांशी सौजन्यतेने वागावे, अपघातामधील रुग्ण दवाख्यान्यात आला तर त्याच्याकडून कागदपत्राची प्रथम मागणी न करता त्याच्यावर उपचार सुरू करावे व त्यानंतर रुग्णाच्या नातेवाईकाकडून कागदपत्रांची मागणी करावी व रुग्ण आय.पी.एफ. मधील नसेल तर त्या रुग्णाला सुरुवातीच्या उपचारानंतर सरकारी दवाखान्यात भरती करण्यास नातेवाईकाला सांगावे, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या.

दिनांक ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी कोणत्या धर्मादाय रुग्णालयांची पाहणी करावयाची आहे याबाबत समितीची बैठक पुणे येथील विश्रामगृहात घेण्यात आली होती. धर्मादाय रुग्णालयांना मोफत व सवलतीच्या दराने खाटा राखून ठेवण्याच्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासनाने दोन समित्या गठित केलेल्या आहेत. त्यातील जिल्हा स्तरावरील समितीमधील जिल्हा शल्य चिकित्सक आणि उच्चाधिकार समितीमधील सहायक संचालक, आरोग्य सेवा, मुख्य वैद्यकीय अधिकारी/प्रतिनिधी महानगरपालिका आणि सहायक विक्रीकर आयुक्त हे समितीवरील सदस्य असून त्यांना या बैठकीस बोलाविण्यात आले होते. परंतु ते कालही उपस्थित नव्हते आणि आजही उपस्थित झालेले नाहीत, ही अतिशय गंभीर बाब असून तत्संदर्भात समितीने नाराजी व्यक्त केली. यानंतर समितीने विचार विनिमय करून के.ई.एम. हॉस्पीटल आणि इनल्याक्स ॲण्ड बुधराणी हॉस्पीटल या हॉस्पीटल्सना भेटी देण्याचे निश्चित केले.

समितीने के.ई.एम. हॉस्पीटल येथे भेट दिली असता निर्धन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना मिळणाऱ्या सोयीसुविधांबाबतची माहिती देणारा फलक दर्शनी भागात लावला होता. परंतु आयपीएफ आणि ईडब्ल्यूएस रुग्णांसाठी किती खाटा उपलब्ध आहेत, त्यापैकी किती खाटांवर रुग्ण उपचार घेत आहेत, किती खाटा रिक्त आहेत याची माहिती असलेला फलक लावण्यात आला नव्हता. याबाबत समितीने विचारणा केली असता आमच्या रजिस्टरला ही सर्व माहिती उपलब्ध आहे असे सांगण्यात आले. त्यावर समितीने आपण बाहेर फलक लावल्यास किती रुग्ण उपचार घेत आहेत, किती खाटा रिक्त आहेत याची माहिती सर्वांना उपलब्ध होईल. तेव्हा असा फलक लावण्यात यावा तसेच या योजनेंतर्गत उपचार घेत असलेल्या रुग्णांची माहिती देणारा डिजीटल फलक देखील लावावा असे सांगितले.

यानंतर समितीने आयपीएफ आणि ईडब्ल्यूएस अंतर्गत उपचार घेत असलेल्या रुग्णांची चौकशी केली असता एका रुग्णांच्या नातेवाईकांनी सांगितले की, ते आयपीएफमध्ये मोडत असताना देखील त्यांच्याकडून अनामत रक्कम घेण्यात आली. समितीने त्याबाबत विचारणा केली असता सोशल वर्कर यांनी सांगितले की, ते वॉचमन म्हणून काम करीत असून त्यांना सात हजार रुपये पगार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी त्यांचे वार्षिक उत्पन्न २१ हजार रुपये असल्याचा दाखला आणून दिला. त्यानंतर आम्ही त्यांच्यावर मोफत उपचार करीत आहोत. त्यांनी भरलेली अनामत रक्कम त्यांना परत करण्यात येईल.

समितीने आयपीएफ अंतर्गत उपचार घेत असलेल्या एका मुलाच्या नातेवाईकाकडे त्यांच्याकडून पैसे घेण्यात आले का याबाबत विचारणा केली असता रुग्णाच्या नातेवाईकानी सांगितले की, माझ्या मुलास ब्लड कॅन्सर असून त्यांनी सुरुवातीला पैसे भरले होते. आम्ही उत्पन्नाचा दाखला दिल्यावर नंतरचे उपचार मोफत केलेले आहेत. त्याबाबत सोशलवर्करकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, रुग्णांच्या नातेवाईकांनी उत्पन्नाचा दाखला दिल्यानंतर रुग्णांवर मोफत उपचार केलेले आहेत. त्यावर समितीने रुग्णालयात सुरुवातीस भरलेले पैसे परत केले पाहिजेत असे सांगितले.

यानंतर समितीने आयपीएफ आणि ईडब्ल्यूएस अंतर्गत उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना कोणत्या प्रकारच्या अडचणी येतात याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, येथील सोशल वर्कर कोणत्याही प्रकारची नीट माहिती देत नाहीत. सारख्या फेऱ्या मारायला लावतात. त्यावर समितीने सोशलवर्कर्सनी लोकांना या योजनेची नीट माहिती दिली पाहिजे, या योजनेची माहिती जास्तीत जास्त लोकांना मिळेल. या दृष्टीने उपाययोजना करावी अशीही सूचना समितीने केली.

यानंतर समितीने हॉस्पीटलच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करताना सांगितले की, ही विधिमंडळाची समिती असून धर्मादाय खाजगी रुग्णालयांतील निर्धन आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी नियमाप्रमाणे एकूण खाटांच्या १०% + १०% अशा एकूण २० टक्के खाटा राखून ठेवण्यात आल्या आहेत काय, तसेच त्यांना योग्य उपचार मिळतात किंवा कसे याची तपासणी ही समिती करते. समितीने या रुग्णालयांना भेट दिल्यानंतर आणि रुग्णांच्या नातेवाईकांशी चर्चा केल्यानंतर समितीच्या असे निदर्शनास आले की, या योजनेसंबंधी रुग्णांच्या नातेवाईकांना योग्य ती माहिती दिली जात नाही. आयपीएफ आणि ईडब्ल्यूएस अंतर्गत उपचार घेत असलेल्या रुग्णांची माहिती दर्शविणारा फलक रुग्णालयाच्या प्रथम दर्शनी भागात दिसून आला नाही. केशरी रेशनकार्ड असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांकडून पैसे घेण्यात आल्याच्या तक्रारी समितीकडे आहेत त्यावर अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही सुरुवातीला त्यांच्याकडे

कागदपत्रांची मागणी करतो परंतु ते कागदपत्रे सादर करीत नाहीत. आमचा अनुभव असा आहे की, रुग्णाला डिस्चार्ज देताना ते कागदपत्र सादर करतात. काही वेळा रुग्णाला घरी घेऊन गेल्यानंतर कागदपत्र सादर करतात. आम्ही आयपीएफ आणि ईडब्ल्यूएस रुग्णांसाठी खाटा राखून ठेवलेल्या आहेत परंतु आयसीसीयुमध्ये खाटा राखून ठेवता येत नाही. त्यावर समितीने या योजनेंतर्गत उपचार घेत असलेल्या रुग्णांना बाहेरुन औषध आणायला सांगितली जातात. अशी तक्रार असल्याचे सांगितले असता अधिकाऱ्यांनी सांगितले की, रुग्णालयातील मेडीकल दुकानात जर औषधे उपलब्ध नसतील तर रुग्णांच्या नातेवाईकांना औषधे विकत आणायला सांगितले जाते, परंतु नंतर त्यांना ते पैसे परत करण्यात येतात. या योजनेचे स्वतंत्र बँक खाते आहे काय अशी विचारणा केली असता स्वतंत्र बँक खाते नसल्याचे सांगण्यात आले. आपल्या आयपीएफमध्ये ४० लाख रुपये जमा आहेत याचा अर्थ आपल्या येथे ही योजना नीट राबविली जात नाही असे दिसते. कारण समितीने काही रुग्णालयांना भेटी दिल्या असता त्या रुग्णालयांचा आयपीएफ अकाऊन्ट मायनसमध्ये असल्याचे दिसून आले. यापुढे आयपीएफचे स्वतंत्र खाते ठेवण्यात यावे, तसेच जर एखादा अपघातग्रस्त रुग्ण दाखल झाला असेल तर आपण त्याच्यावर प्रथम उपचार केले पाहिजेत आणि दोन दिवसानंतर त्यांच्या नातेवाईकांकडे कागदपत्रांची विचारणा केली पाहिजे. या योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या रुग्णाच्या नातेवाईकांना एकाच छताखाली सर्व माहिती उपलब्ध होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. आपण अशा रुग्णांना फक्त रेशनकार्ड आणि उत्पन्नाचा दाखला या दोन गोष्टींबाबत विचारणा केली पाहिजे. त्यांचे उत्पन्न किती, त्यांच्याकडे शेती किती याबाबत चौकशी करण्याचा आपणाला अधिकार नाही. सोशलवर्कर रुग्णाच्या नातेवाईकांशी उद्धटपणे बोलतात. त्यांना नीट माहिती देत नाहीत. त्याशिवाय आयपीएफ आणि ईडब्ल्यूएस अंतर्गत राखून ठेवलेल्या खाटांचा तपशील दिलेला नाही. ते अत्यंत चुकीचे आहे. आपल्या एकूणच कारभाराबाबत समिती नाराजी व्यक्त करीत आहे. रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, रुग्णालयात दाखल करण्यात आलेली रेशनकार्ड खूप जुनी असतात, त्याबाबत विचार व्हावा अशी विनंती आहे. आमचे रुग्णालय अनाथ मुलांवर मोफत उपचार करते. ही संस्था १०४ वर्षाची जुनी असून समितीने ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याचे निश्चितपणे पालन केले जाईल.

समितीने इनल्याक्स अँड बुधराणी हॉस्पिटल येथे भेट दिली असता डॉ. सुंदर वासवाणी यांनी समितीचे स्वागत केले. रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत उपचाराच्या संदर्भातील मोठ्या आकारातील फलक असल्याचे तसेच संपूर्ण हॉस्पिटल स्वच्छ, नीटनेटके व रुग्णांची चांगल्या प्रकारे काळजी घेत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

समितीने कार्डिॲक वॉर्डमधील रुग्णांची विचारपूस केली असता त्यांनी त्यांचा मोफत उपचार होत असल्याचे सांगितले. तसेच डॉ. सुंदर वासवाणी यांनी अशी माहिती दिली की, रुग्णालयामार्फत पुणे जिल्ह्यातील खेड्यांमध्ये जाऊन तेथील मोतीबिंदू असलेल्या रुग्णांना आमच्या वाहनांने येथे आणून त्यांच्यावर उपचार करतो. उपचार झाल्यानंतर या रुग्णांना पुन्हा आमच्या वाहनाने त्यांच्या गावी पोहचवले जाते. तसेच या रुग्णांकडून मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क घेतले जात नाहीत. यामध्ये रुग्णाचे वार्षिक उत्पन्न किती आहे हे बघितले जात नाही. सर्व मोतीबिंदुच्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाते. तसेच ज्या रुग्णांना हात-पाय नसतात अशा रुग्णांना आम्ही कृत्रिम हात-पाय विनामूल्य बसवून देतो अशी माहिती फोटोसह समितीला सादर करण्यात आली. तसेच आम्ही शासनाकडून एफएसआयची सवलत वगळता कोणत्याही प्रकारची सवलत घेतलेली नाही. याबाबत समितीने इनल्याक्स अँड बुधराणी हॉस्पिटल यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

समितीने दिनांक ४ व ५ रोजी पुणे जिल्ह्यातील धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी केली. तपासणीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटींच्या संदर्भात तसेच इतर बाबी संदर्भात माहिती घेण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली.

धर्मादाय रुग्णालयातील गरीब व निर्धन रुग्णांवर १०% + १०% खाटा मोफत व सवलतीच्या दराने राखून ठेवण्याच्या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात पुणे जिल्ह्यातील रुग्णालयातील सद्यःस्थिती काय आहे व त्यावर नियंत्रण कसे ठेवले जाते ? अशी समितीने विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी पुणे जिल्ह्यामध्ये ५९ धर्मादाय रुग्णालये असून त्या सर्व रुग्णालयांमध्ये नियमानुसार २० टक्के खाटा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी देखरेख समितीची बैठक असते. त्या बैठकीला जिल्हा शल्य चिकित्सक आणि प्रतिनिधी उपस्थित असतात. एखाद्या धर्मादाय रुग्णालयात गरीब रुग्णावर उपचार नाकारले असतील किंवा त्यांच्याकडून पैसे घेतले अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास आम्ही त्याची दखल घेऊन चौकशी करतो व प्रत्येक महिन्याला याबाबतचा आढावा घेतो.

रुग्णांकडून आवश्यक ती कागदपत्रे असताना त्यांना उपचार मिळालेले नाहीत अशाप्रकारच्या तक्रारी आपल्याकडे आल्या आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी अशा तक्रारी आल्यास आम्ही रुग्ण आणि रुग्णालयातील संबंधित अधिकारी यांना बोलावून दोघांचे म्हणणे ऐकून घेऊन आदेश पारीत करतो. सह्याद्री रुग्णालयातील तक्रारीबाबत मुंबई कार्यालयातून आम्हाला पत्र प्राप्त झाले होते. त्यामध्ये सह्याद्री रुग्णालयातील एका रुग्णाकडून तीन लाख रुपये घेण्यात आले. त्याबाबत चौकशी केली असता सह्याद्री रुग्णालयाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, आम्ही त्या व्यक्तीची माहिती घेतली असता ती व्यक्ती एमएसईबीमध्ये नोकरी करीत असून तिचे पुण्यामध्ये दोन फ्लॅट आहेत. तहसीलदारांनी कोणतीही शहानिशा न करता त्यांना उत्पन्नाचा दाखला का दिला अशी त्यांनी विचारणा केली पाहिजे. जो खरोखर गरीब असेल आणि त्याच्याकडून पैसे घेतले असल्यास त्याबाबत चौकशी करून रुग्णाला पैसे परत करण्याचे आदेश दिलेले आहेत.

एखादी अपघाताची केस असेल किंवा एखाद्याला हृदयविकाराचा झटका आला असेल तर अशा प्रकरणांमध्ये तातडीने उपचार केले जात नाहीत. त्यांच्याकडे अनामत रकमेची मागणी करण्यात येते, असे समितीने उद्‌धृत केले असता सह धर्मादाय आयुक्त यांनी माहिती दिली की, पंधरा दिवसांपूर्वी एक बैठक घेतली होती त्या बैठकीस सर्व धर्मादाय रुग्णालयांच्या प्रतिनिधींना बोलाविले होते. त्यावेळी त्यांना सांगण्यात आले की, पुणे परिसरात कुठेही अपघात झाला असेल आणि तो रुग्ण आपल्या रुग्णालयात दाखल केल्यास आपण प्रथम त्याच्यावर मोफत उपचार करावेत.

गोरगरिबांकरिता ही योजना आहे. १० टक्के निर्धनांवर मोफत उपचार केले जातात. त्यांना मोफत औषधोपचार आणि जेवण दिले जाते. तर १० टक्के दुर्बल घटकांकडून ५० टक्के सवलतीच्या दरात उपचार केले जातात त्यामध्ये औषधोपचाराचा समावेश आहे काय अशी समितीने विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी त्यास होकारार्थी उत्तर दिले. दोन रुग्णालयामध्ये दुर्बल घटकातील रुग्णांना बाहेरुन औषधे आणण्यास सांगितले होते, हा त्यांच्यावर अन्याय नाही काय ? जर असे प्रकार घडत असतील तर अशा रुग्णांलयावर कोणती कारवाई करणार अशी समितीने विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी आयपीएफच्या रुग्णांना बाहेरुन औषधे आणण्यास भाग पाडले जाते. हॉस्पिटलच्या दवाखान्यात औषधे नसतील तर अशावेळी बाहेरील औषधांचे बिल आयपीएफच्या खात्यामध्ये टाकून त्या रुग्णांना औषधांचे पैसे परत करण्याच्या समितीने सूचना केलेल्या आहेत अशी माहिती दिली.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मागील ३ वर्षामध्ये किती रुग्णालयांची तपासणी केली, त्यानुसार या समितीने विभागीय आयुक्तांना प्रत्येक ३ महिन्यात अहवाल सादर केला आहे काय अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीमध्ये जिल्ह्यातील विधानसभा व विधानपरिषद सदस्यांचा समावेश असून त्या समितीमध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, सहायक आयुक्त, धर्मादाय आयुक्त सदस्य म्हणून असतात आणि निवासी उप जिल्हाधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहत असतात. सरकार गठित झाल्यानंतर आमची समिती गठित झालेली आहे. या अगोदरही समिती अस्तित्वात होती. ही समिती रुग्णालयांची तपासणी करीत नाही. ही समिती आपल्या योजनेची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे किंवा कसे यावर नियंत्रण ठेवत असते. रुग्णालयाचे सोशल वर्कर या समितीच्या बैठकीमध्ये हजर असतात. या समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा होत असते व देखरेख समितीची बैठक प्रत्येक महिन्यातून एकदा होत असते. शासन निर्णय असे म्हणतो की, जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीने सातत्याने धर्मादाय रुग्णालयाच्या कार्यप्रणालीवर संनियंत्रण ठेवले पाहिजे. त्यानुषंगाने आम्ही प्रत्येक महिन्यात एक बैठक घेण्याचे निश्चित केले आहे. एक बैठक धर्मादाय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हास्तरीय बैठकीत सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीमध्ये प्रत्येक महिन्यात एक बैठक घेणार आहोत असे समितीस सांगितले.

समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी पुणे शहरातील धर्मादाय रुग्णालयांना भेटी दिल्या. परंतु समितीच्या दौऱ्यामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, सहायक संचालक आरोग्य सेवा, महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी, सहायक विक्रीकर आयुक्त उपस्थित नव्हते. समिती त्यांच्या अनुपस्थितीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. यापुढे त्यांनी समितीच्या बैठकीत उपस्थित राहिले पाहिजे याची संबंधितांनी नोंद घ्यावी असेही समितीने बैठकी दरम्यान निदेश दिले.

शासन धर्मादाय रुग्णालयांना सुविधा देते. त्या बदल्यात रुग्णालयाने गरीब रुग्णांवर मोफत व सवलतीच्या दरात उपचार द्यावयाचे आहेत. काही धर्मादाय खाजगी रुग्णालयाने रुग्णालयांच्या बाहेर तसा फलक लावलेला नाही. रुग्णालयात किती खाटा आरक्षित आहेत त्यापैकी किती खाटांवर रुग्ण आहेत, किती खाटा रिक्त आहेत याची माहिती दिलेली नाही. तसेच या योजनेनुसार रुग्णांना त्यांच्या उत्पन्नातून दोन टक्के रक्कम बाजूला काढून त्याचे वेगळे बँक खाते ठेवले पाहिजे. त्याच्या पासबुकमध्ये इन्ट्री झाल्या पाहिजेत. आपल्या मुख्य अकाऊन्टमधून त्या अकाऊन्टमध्ये पैसे जमा झाले पाहिजेत. बऱ्याच धर्मादाय रुग्णालयांनी वेगळे बँक खाते उघडलेले नाही. काही धर्मादाय रुग्णालयांचे बँक खाते मायनसमध्ये आहे तर काही धर्मादाय रुग्णालयांचे बँक खाते प्लसमध्ये आहे. जिल्हास्तरीय समितीने पाहणी केली असती तर रुग्णालयातील अशा प्रकारच्या त्रुटी राहिल्या नसत्या, अशी समितीने विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी समितीचे म्हणणे बरोबर आहे, स्वतंत्र बँक खाते असले पाहिजे. धर्मादाय रुग्णलयांनी त्याचे स्वतंत्र लेजर ठेवलेले आहे, अशी समितीला माहिती दिली. त्यानंतर समितीने कायद्यामध्ये वेगळे खाते ठेवण्याची तरतूद आहे का. अशी विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी स्वतंत्र खात्यामध्ये स्वनिधी ठेवावा, बँक अकाऊन्ट असे म्हटलेले नाही, अशी माहिती दिली. त्यावर समितीने इंग्रजीमधील तरतुदीमध्ये " (2) The Charitable Hospitals shall physically transfer 2% of the total patients billing (excluding the bill of indigent and weaker section patients) in each month to IPF Account." या ठिकाणी आयपीएफ अकाऊन्ट असे म्हटलेले असल्याचे निदर्शनास आणले.

त्यावर सह धर्मादाय आयुक्त यांनी आयपीएफचे वेगळे बँक खाते ठेवले पाहिजे, अशी समितीला दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ रोजी माहिती दिली होती. माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी धर्मादाय रुग्णालयात निर्धन आणि दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार करण्यासाठी ही योजना तयार केली आहे. या योजनेमध्ये माननीय उच्च न्यायालयाने निदेश दिलेले आहेत. त्या निदेशाप्रमाणेच या योजनेची अंमलबजावणी केली जाते. या योजनेमध्ये स्वतंत्र बँक खाते समाविष्ट करावयाचे झाल्यास माननीय उच्च न्यायालयाकडे तशाप्रकारची विनंती करावी लागेल. तरी देखील या संबंधीचा विनंती अर्ज मी समितीकडे सादर करतो. आपण त्यावर विचार विनिमय करावा त्याप्रमाणे आम्ही कार्यवाही करतो.

विभागीय आयुक्तांनी याबाबत केव्हा केव्हा बैठका घेतल्या व त्यामध्ये कोणकोणते निर्णय घेतले, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय आयुक्त यांनी आमच्या पातळीवर १५ दिवसांपूर्वी बैठक घेतली होती. त्यामध्ये दोन महत्वाचे विषय ठेवले होते. काही धर्मादाय रुग्णालयांनी उच्च न्यायालयात केस दाखल केलेली आहे की, काही रुग्ण बनावट प्रमाणपत्र सादर करून औषधोपचार घेत असल्यामुळे जे खरे गोरगरीब रुग्ण आहेत त्यांना उपचार मिळत नाहीत. अशी केस दाखल केल्यामुळे माननीय उच्च न्यायालयाने महसूल विभागाच्या प्रधान सचिवांना या संदर्भात सुधारणा करण्यासाठी दोन आठवडे दिलेले आहेत. एक-दोन टक्के लोक चुकीचे वागत असतील म्हणून आपण अन्य लोकांवर अन्याय करू शकत नाही. जर अपघातग्रस्त रुग्ण रुग्णालयात दाखल केल्यास आपण त्याच्यावर प्रथम उपचार करून नंतर त्यांच्याकडे कागदपत्रांची मागणी करावी. एखादा रुग्ण बनावट आहे असे रुग्णालयास वाटत असेल तर त्यांनी आम्हाला सांगावे, रुग्णलयांनी स्वतःच्या पातळीवर निर्णय घेऊ नये. त्यांनी नियमाप्रमाणे काम करावे, असे समितीस सांगितले.

सोशल वर्करची नियुक्ती हॉस्पिटलचे मॅनेजमेंट करीत असते काय, अशी समितीने विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी होय असे उत्तर दिले. त्यावर समितीने सोशल वर्कर रुग्णांशी व्यवस्थित वागत नाहीत अश्या तक्रारी असल्याचे सांगितले असता सह धर्मादाय आयुक्त यांनी सर्व सोशल वर्करने रुग्णांशी कसे वागावे यासंदर्भात दोन महिन्यापूर्वी एक बैठक घेऊन त्या बैठकीत यासंदर्भात निर्देश देण्यात आले होते. सोशल वर्कर हा दुवा आहे याची मी त्यांना जाणीव करून दिली होती. आता यामध्ये ८० टक्के सुधारणा झाली असून यामध्ये आणखीन सुधारणा होण्यास वाव आहे, असे समितीस सांगितले.

काही रजिस्टर्ड हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबवली जाते. त्यामुळे काही हॉस्पिटल आयपीएफ आणि इडब्ल्यूएस चे पेशंट्स राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये घालण्याचा प्रयत्न करतात. परंतु राजीव गांधी योजनेमध्ये रुग्ण बसत नसतील तर अशा रुग्णांना आयपीएफ आणि इडब्ल्यूएस मध्ये बसवून त्यांच्यावर उपचार केले गेले पाहिजेत. त्यामुळे योजनेच्या संदर्भातील माहिती रुग्णांना उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे, अशी समितीने सूचना केली असता, सह धर्मादाय आयुक्त यांनी समितीने केलेली सूचना खूप चांगली असल्याचे मान्य केले.

त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना आणि धर्मादाय रुग्णालय या दोन्ही योजनांचा समन्वय जिल्हाधिकारी कार्यालयाशी होत असतो. दोन्ही योजनेची सेवा ज्या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहे अशा ठिकाणी ही सेवा देण्याच्या संदर्भात एक बैठक आयोजित करून दोन्ही सेवा एकाच ठिकाणी मिळण्यासाठी प्रयत्न करतो.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये ठराविक आजार समाविष्ट असून त्यावर रक्कम सुद्धा ठराविक आहे. सर्व कागदपत्र ॲडमिशनच्यावेळेस सबमिट करावे असे हॉस्पिटलचे म्हणणे असते. सोशल वर्कर कशी वागणूक देतात त्यावर या योजना अवलंबून आहेत. त्यामुळे आम्ही यासंदर्भात ट्रस्टच्या सोशल वर्करची मदत घेऊ. तसेच सन्माननीय समितीने सांगितल्या प्रमाणे ५९ धर्मादाय हॉस्पिटलचा नोडल ऑफिसर कोण आहे त्यासंदर्भात आम्ही यादी काढून ती यादी तत्काळ सर्व सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करून देऊ. नोडल ऑफिसरशी कोणीही संपर्क साधल्यास त्यांना त्यांच्याकडून सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करून दिली जाईल तसेच संबंधितांचा मोबाईल नंबर दुसऱ्या कोणाकडे जाणार नाही किंवा बंद पडणार नाही याचीही काळजी घेण्यात येईल असे सांगितले.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या संदर्भात सोशल वर्कर असून ते राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या संदर्भात माहिती देत असतात. परंतु यापुढे धर्मादाय रुग्णालयाच्या संदर्भातील जबाबदारी राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या सोशल वर्करकडे दिली जाण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे सह धर्मादाय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जिल्ह्यातील रुग्णालयांची केव्हा केव्हा तपासणी केली आहे त्यासंदर्भातील मागील ३ वर्षांची माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात यावी तसेच तपासणीमध्ये कोणत्या त्रुटी आढळून आल्या व समितीने उच्चस्तरीय समितीस केव्हा केव्हा अहवाल सादर केला याचीही माहिती उपलब्ध करून देण्यात यावी, अशी समितीने विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी आम्ही देखरेख समितीचा अहवाल मुख्य कार्यालयास पाठवितो. जर एखाद्या गरीब रुग्णावर उपचार नाकारण्यात आले असतील किंवा त्यांच्याकडून पैसे घेण्यात आले असतील तर ते पैसे त्यांना परत देण्यात येतात आणि संबंधित रुग्णालयांना नोटीस देण्यात येते. त्याशिवाय तालुका स्तरावर मेळावा घेऊन या योजनेची माहिती देण्यात येते. तसेच कोणास काही अडचण असल्यास त्यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा असे सांगितले जाते अशी माहिती दिली.

त्यानंतर समितीने दीनानाथ मंगेशकर हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च सेंटर, जहांगीर नर्सिंग होम व इनल्याक्स ॲण्ड बुधराणी हॉस्पीटल या रुग्णालयांनी देखील चांगल्या प्रकारचे काम करीत असल्याचे सांगून समितीने त्यांचे अभिनंदन केले.

ही योजना राबविताना आपणास कोणत्या प्रकारच्या अडचणी येतात, आपणास शासनाकडून मदतीची आवश्यकता आहे काय? आपल्या काही सूचना वा आपणास काही सूचना मांडावयाच्या असतील तर आपण जरुर मांडाव्यात. शासनाबद्दल आपली काही नाराजी असेल तर ती देखील मांडावी जेणे करून शासन त्यामध्ये काही सुधारणा करू शकेल, अशी समितीने विचारणा केली असता सह धर्मादाय आयुक्त यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ५० हजार रुपये आहे त्यामध्ये वाढ करावी अशी विनंती करून ५० हजार उत्पन्नामध्ये कोण बसते की बसत नाही यामध्ये अनेक वेळा अडचणी निर्माण होतात. त्यामुळे ही मर्यादा वाढविता येईल किंवा कसे हे पहावे अशी समितीकडे मागणी केली.

जिल्हाधिकारी यांनी पुणे जिल्ह्यातील धर्मादाय खाजगी रुग्णालयातील निर्धन व दुर्बल घटकांसाठी चांगल्या प्रकारे उपचार करण्यात येत असून त्यांची बॅलन्सशीट मायनसमध्ये आहे. तर काही रुग्णालयातील आयपीएफ फंड १० कोटी, ७ कोटी रुग्णालयात जास्त शिल्लक आहे, अशा रुग्णालयांवर कारवाई करावयाची झाल्यास त्यांचे रजिस्ट्रेशन कॅन्सल करावे लागेल. परंतु तसे केल्याने आपला हेतू साध्य होणार नाही. रुग्णालयांकडे पैसे असूनसुद्धा ते सेवा देत नसतील तर अशा रुग्णालयांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबतची तरतूद असावी असे मला वाटते. त्याचप्रमाणे

अशा रुग्णालयांच्या आयपीएफ फंडामध्ये जेवढी रक्कम शिल्लक असेल तेवढी रक्कम युनिव्हर्सल सर्व्हीसेस फंडामध्ये ट्रान्सफर करावी व जे रुग्णालय गरीब रुग्णांवर योग्य प्रकारे उपचार करीत असतील आणि ती मायनसमध्ये असतील अशा रुग्णालयांनी या युनिव्हर्सल फंडमधून रक्कम खर्च करावी. त्याचप्रमाणे जी रुग्णालये गरीब व निर्धन रुग्णांवर चांगल्याप्रकारे उपचार करीत असतील अशा रुग्णालयांना प्रोत्साहनपर बक्षिस योजना जाहीर करावयास पाहिजे. असे केल्याने बरीचशी रुग्णालये गरीब रुग्णांना चांगली सेवा देतील असे मत वक्त केले.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई येथे मंगळवार, दिनांक १५ मे, २०१८ रोजी झालेल्या धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करण्यासंदर्भातील तदर्थ संयुक्त समितीच्या बैठकीमध्ये दिनांक ४ व ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या पुणे जिल्ह्याच्या दौऱ्यामध्ये धर्मादाय खाजगी रुग्णालयांना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेण्यात आली. समितीने पुणे जिल्ह्यातील दौऱ्याच्या वेळी जहांगीर नर्सिंग होम, संचेती हॉस्पिटल, के.ई.एम. हॉस्पिटल येथे योजनेच्या माहितीचे डिजिटल फलक रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आलेले नव्हते ते लावले आहेत काय, तसेच या जिल्ह्यातील इतर रुग्णालयांमध्ये असे फलक लावण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ? तसेच रुग्णालयांनी डिजिटल फलक लावले की नाही या बाबीची आपण शहानिशा केली आहे का? असे विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांमध्ये डिजिटल फलक लावण्यात यावेत असा उल्लेख नव्हता, परंतु समितीने दिलेल्या निर्देशांनुसार डिजिटल फलक लावण्याबाबत आम्ही रुग्णालयांना कळविले असून त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे व याबाबत आमच्या कार्यालयाकडून शहानिशा करण्यात आली आहे. त्यानंतर समितीने असे विचारले की, सर्वच जिल्ह्यांमधील रुग्णालयांमध्ये डिजिटल फलक लावलेले नसतात व याबाबी वारंवार निदर्शनास येतात. त्यामुळे इतर जिल्ह्यांमध्ये देखील अशा प्रकारचे फलक लावण्यात यावेत. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याबाबत १५ दिवसांमध्ये आम्ही तपासणी करू.

समितीने विचारले की, रुग्णांच्या बेडवर सदर रुग्ण आय.पी.एफ. किंवा ई.डब्ल्यू.एस.चा असल्याबाबतचा फलक लावण्यासंदर्भात रुग्णालयांनी केलेली अंमलबजावणी व त्यावर शासनामार्फत कशा प्रकारे देखरेख करण्यात येते याची समितीला माहिती देण्यात यावी. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, प्रत्येक रुग्ण आय.पी.एफ. किंवा ई.डब्ल्यू.एस. यापैकी कोणत्या दर्जामधील आहे त्याप्रमाणे त्याच्या बेडवर फलक लावले जाते. याच्या अंमलबजावणीसाठी आम्ही पत्र दिले होते व त्याची तपासणी देखील झाली आहे. तपासणीमध्ये लक्षात आले की, ज्या दर्जाचे रुग्ण आहे त्याच्या बेडला फलक लावले जात आहे. परंतु काही रुग्णालयांचे असे मत आहे की, अतिदक्षता विभागामधील रुग्णाच्या बेडला असे फलक लावू नये. दोन रुग्णांमध्ये त्यामुळे भेदभाव केला जातो. सदर रुग्ण आय.पी.एफ. दर्जामधील असल्याचे रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना देखील माहिती होते व त्यामुळे रुग्णाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. त्यावर समितीने विभागीय प्रतिनिधींना सांगितले की, असे करू नये. कारण सर्वांना सारखेच उपचार मिळाले पाहिजेत हीच अपेक्षा आहे. उपचारांमध्ये दुर्लक्ष केल्याबाबत जर रुग्णाची तक्रार आली तर आपण संबंधितांवर कारवाई करा. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ठीक आहे व त्याप्रमाणे आपण दिलेल्या निर्णयानुसार कारवाई करण्यात येईल.

समितीने रुबी हॉल क्लिनिकमध्ये श्री. दिपक भुजबळ यांचेवर या योजनेंतर्गत उपचार करताना त्यांचेकडून घेतलेली अनामत रक्कम रुबी हॉल रुग्णालयाने त्यांना परत दिली आहे का? संचेती हॉस्पिटलमधील श्री. बाळ दिगंबर थोरात यांनी भरलेली सर्व रक्कम रुग्णालयाने त्यांना परत केली किंवा कसे याची माहिती देण्यात यावी.

तसेच अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्यास त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याबाबत विभागीय प्रतिनिधींना सांगितले असता विभागीय प्रतिनिधींने सांगितले की, सदर दोन्ही रुग्णांचे पैसे परत करण्यात आले आहेत. समितीने असेही सांगितले की, असा अनुभव सर्वच ठिकाणी येतो. रुग्णालय प्रशासन अगोदर पैसे भरण्यास सांगते. ही प्रकरणे उघड झाली म्हणून पैसे परत देण्यात आले. कुठल्या तरी कारणाने पैसे भरण्यास रुग्णांना सांगितले जाते. प्रत्येक जिल्ह्यामध्ये आपल्या विभागाचे समन्वयक असतात परंतु त्यांचे देखील फोन लागत नाहीत. आपण शेगाव संस्थानाचे उदाहरण पाहू शकतो. स्वयंसेवक जेवढे मनापासून काम करतील तेवढे काम पगारी व्यक्ती करु शकत नाहीत. तसेच त्यांना अतिशय कमी पगार असल्यामुळे ते रुग्णालय प्रशासनाशी देखील हातमिळवणी करु शकतात. कारण एका रुग्णाच्या देयकामध्ये अशी चार माणसे कामाला राहू शकतात. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून आपला माणूस आपल्याला माहिती देखील देऊ शकतो व रुग्णांचीही मदत करू शकतो. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासाठी काय करता येईल त्याचा विचार करू.

समितीने असे विचारले की, रुबी हॉल क्लिनिकमध्ये निर्धन रुग्णाच्या निधी खात्यामध्ये ७ कोटी रुपये जमा असल्यासंदर्भाची व त्यानंतरच्या निधीची सद्यस्थिती काय आहे? सदर सर्व निधी त्यांनी खर्च केला असल्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी साक्षीच्या वेळेस सांगितले. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, अचानक ७ कोटी रुपये कसे खर्च करण्यात आले? आपण बैठक घेतली त्यावेळी पैसे होते, परंतु आता ते सर्व खर्च झाले आहेत. याबाबत आम्हाला आश्चर्य वाटत असून आपल्याला देखील याचे आश्चर्य वाटत असावे. याबाबत समितीच्या सूचनेप्रमाणे आम्ही याबाबत चौकशी सुरू केलेली असून प्रत्येक रुग्णावर किती पैसे खर्च करण्यात आले याबाबतची ऑनलाईन पाठविण्यात आलेली माहिती देखील उपलब्ध आहे.

यामध्ये काही तरी गडबड असून अचानक रुग्णांवर ७ कोटी रुपये खर्च होणे बरोबर नाही, असे समितीला वाटते. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, प्रत्येक रुग्णालयाने पाठीमागील महिन्यामध्ये कोणत्या रुग्णावर किती पैसे खर्च केले त्याची यादी आपल्याकडे ऑनलाईन येते. कोणत्याही रुग्णाच्या नावावर क्लिक केल्यानंतर उत्पन्नाचा पुरावा व त्याचे रुग्णालयाचे देयक येते. पारदर्शकता आणण्याबाबत आपण येथपर्यंत पोहचलो आहोत. जर काही चुकीची देयके लावली असतील तर त्याबाबत आमची चौकशी सुरू आहे. त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना म्हणजेच आताचे महात्मा फुले आरोग्य अभियानासाठी एक वेगळा विभाग तयार करण्यात आलेला आहे. एखाद्या रुग्णाने तक्रार केली तर कार्यालय थेट रुग्णाशी संपर्क करते. रुग्णाकडून प्रथम माहिती घेतली जाते. हॉस्पिटल मान्यता रद्द होण्याची भीती वाटत असल्यामुळे रुग्णांवर व्यवस्थित उपचार केले जातात. आपण तशा प्रकारे मान्यता रद्द करू शकत नाहीत कारण धर्मादाय खासगी रुग्णालये नोंदणीकृत आहेत. परंतु आपल्याकडे या अनुषंगाने संपूर्ण माहिती घेणारा एक विभाग असेल तर तक्रारींच्या अनुषंगाने आपली तपासणी केली जाते ही भीती तरी निर्माण होईल, असे समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीनी असे सांगितले की, पुण्यामध्ये याबाबत बऱ्यापैकी जागृती झाली आहे. सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, पुण्यामध्ये जर एखाद्या रुग्णाकडून पैसे घेतले तर ते तशी तक्रार आमच्याकडे करतात व आम्ही त्यांना पैसे परत करण्याबाबतची प्रकरणे झालेली आहेत. रुबी हॉल क्लिनिकबाबत समितीस शंका असल्यामुळे याबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे समितीने सांगितले असता विभागीय प्रतिनिधीनी याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले.

दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटरमधील श्री. सौंदणकर या रुग्णास त्याचे नातेवाईक भरती करून सोडून गेल्याचे निदर्शनास आल्याबाबत तसेच गत ५ वर्षांमध्ये पुण्यातील विविध रुग्णालयात असे किती रुग्ण आढळून आले आहेत व त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, अशा प्रकरणांबाबत पोलीस स्टेशनला तक्रार देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांवर या योजनेंतर्गत उपचार करताना रुग्णालयाने रुग्णाकडे केशरी रेशनकार्ड किंवा तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला पाहून रुग्णालयात भरती करून घेणे अपेक्षित असताना त्याप्रमाणे रुग्णालयाकडून कार्यवाही होत नाही अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, तहसिलदारांचा दाखला किंवा केशरी रेशन कार्ड असेल तर रुग्णालयांनी उपचार केलेच पाहिजेत. तशा प्रकारचा पत्रव्यवहार करून संबंधितांना सक्त सूचना केलेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली देखील याबाबत बैठक घेण्यात आली होती व त्यामध्येही सूचना देण्यात आल्या आहेत. तरी देखील रुग्णाची तक्रार आल्यास आमचे कार्यालय स्वतः पुढाकार घेऊन रुग्णाला रुग्णालयामध्ये दाखल करून उपचार करण्याबाबत सूचना देते.

कधी-कधी सांगितले जाते की, आमचा कोटा पूर्ण झालेला आहे. अशा वेळी काय करायचे, रुग्णालयांना असा काही कोटा ठरवून दिलेला आहे का याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, एखाद्या रुग्णालयाचा आय.पी.एफ. फंड सलग सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीत निगेटिव्ह बॅलन्स झाला असेल तर त्यांनी मॉनिटरींग समितीकडे अर्ज करायचा असतो की, आमचा फंड संपलेला असून आम्हाला स्थगिती द्यावी. अशा प्रकारचे ४ अर्ज आमच्याकडे आले होते. त्यावेळी सह धर्मादाय आयुक्त यांनी पडताळणी केली व दोन-दोन कोटी रुपये मायनसमध्ये असलेली संचेती हॉस्पिटल, के.ई.एम. हॉस्पिटल व पूना हॉस्पिटल रुग्णालये पाच-पाच कोटी रुपये प्लसमध्ये आली. तसेच माननीय उच्च न्यायालयाच्या नियमानुसार ज्या गोष्टी देयकामध्ये लावायच्या नाहीत त्या गोष्टी त्यांनी लावल्यामुळे हा प्रकार घडला होता. पुन्हा अशी देयके लावू नका अशा सूचनाही त्यांना केल्या. सर्वच रुग्णालयांची तपासणी आता सुरू केली असून यामध्ये आपण ११ हॉस्पिटल्स घेतली आहेत.

पुणे येथील एका रूग्णाने तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला तसेच केसरी रेशन कार्ड सादर केल्यानंतर सदरहू रूग्ण गरिबासारखा दिसत नसल्यामुळे रुग्णालय प्रशासनाने त्या रुग्णाच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबामध्ये किती व्यक्ती नोकरी करीत आहेत व त्यांचे उत्पन्न किती आहे, यासंदर्भातील चौकशी केली. परंतु अशा पद्धतीने एखाद्या रूग्णाची चौकशी करण्याचा अधिकार रूग्णालयाला नसल्याचे समितीचे मत असल्यामुळे समितीने याबाबत विभागीय प्रतिनिधीना विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, क्लॉज १५ मध्ये त्यासंदर्भातील बाबी दिलेल्या आहेत त्या वाचून दाखवितो :—

> " The Charitable Hospital shall verify the economic status of the patient from their Medical Social Worker on the basis of scrutiny of any of the following documents produced by the concerned patient-certificate from Tahsildar, Ration Card,..... "

रुग्णालय प्रशासन रुग्णाच्या कागदपत्रांची तपासणी करू शकते. परंतु रुग्णाच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबियांची चौकशी करू शकत नाही. तसेच क्लॉज १५ मध्ये नेमके काय लिहिण्यात आलेले आहे, ते सविस्तर वाचून दाखविण्याबाबत समितीने सांगितले असता विभागीय प्रतिनिधीनी पुन्हा पुढीलप्रमाणे वाचून दाखविले " The Charitable Hospital shall verify the economic status of the patient from their Medical Social Worker on the basis of scrutiny of any of the following documents produced by the concerned patient - certificate from Tahsildar, Ration Card....." त्यावर समितीने On the basis of documents produced economic status of the patient will be verified by the Medical Social Worker of the Hospital. म्हणजे रुग्णालय प्रशासन कागदपत्रांच्या आधारे तेथे जाऊन तपासू शकतात की, खरोखर रुग्णाची परिस्थिती तशी आहे किंवा नाही. याबाबत क्लॉज १५ मॉडिफाय करायला पाहिजे. अन्यथा आपणच आपल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी खाजगी कंपनीला दिल्यासारखे होईल किंवा सदरहू कुटुंबियांची परिस्थिती खरोखर हालाखीची असल्याचे आमच्या निदर्शनास आले नाही, असे रुग्णालय प्रशासनाकडून सांगितले जाऊ शकते. असे व्हायला नको म्हणून हा क्लॉज मॉडिफाय करण्याची आवश्यकता आहे. That patients economic status should not be left at the mercy of the Medical Social Worker of the concerned Hospital. यासंदर्भात पत्र पाठविण्यात यावे की, अशा प्रकारच्या तपासणी करण्याची बाब सतत व्हायला नको. एखाद्या ठिकाणी खरोखर संशय आला व तसे झाले तर काही हरकत नाही, परंतु प्रत्येकाच्या बाबतीत असे व्हायला नको. आपण त्यामध्ये असे म्हणावे की, तुमचे इंटरपिटीशन चुकीचे आहे व असे करण्यात येऊ नये. रुग्णांच्या हिताकरिता असे करण्यात यावे असे समितीने विभागीय साक्षीच्या वेळी सांगितले असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, ठीक आहे याबाबत कोणतीही चौकशी न करता रूग्णाला अगोदर तातडीने दाखल करावे, असे त्यांना अगोदरच कळविलेले असून तहसीलदाराच्या दाखल्या संदर्भात एस.डी.एम. कडे अपिल करावे, असेही सांगण्यात आले आहे.

आय.पी.एफ. गटातील रुग्णांवर मोफत उपचार व इ.डब्ल्यू.एस. गटातील रुग्णांवर ५० टक्के सवलतीच्या दरात उपचार करण्यात येत असल्याबाबतची माहिती सर्वसामान्य जनतेला होण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आली अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, यासंदर्भातील माहिती सर्वसामान्य जनतेला मिळण्यासाठी कार्यालयाकडून जाहीरात फलक तयार करण्यात आले असून प्रत्येक बस स्टँडवर व रेल्वे स्टेशनवर लावण्यात आलेले आहेत. तसेच या जाहिराती संदर्भात वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्धी देण्यात यावी, अशी विनंती जिल्ह्यातील माहिती अधिकाऱ्यांना करण्यात आलेली आहे.

तहसील कार्यालयात व पंचायत समितीमध्ये मोठ्या संख्येने लोक कामासाठी येत असतात. त्यामुळे या ठिकाणी देखील जाहिरात फलक लावण्यात यावे. एफएम, जींगल द्वारे देखील चांगली जाहिरात करता येऊ शकते व यासंदर्भातील सविस्तर माहिती लोकांपर्यंत पोहोचविली जाऊ शकते. त्यामुळे याबाबत देखील सकारात्मक विचार करण्यात यावा. सर्वसामान्य जनतेला रेडीओ मार्फत सहजरित्या माहिती मिळू शकते व याची व्याप्ती फार मोठी असल्यामुळे डेडिकेटेट फंड देखील असायला पाहिजे. ही बाब सातत्याने करणे आवश्यक असल्यामुळे यासंदर्भात कार्यक्रम निश्चित करावा. फ्लेक्स फलकाची लाईफ साधारणतः तीन महिन्यांची असते. तीन-चार महिन्यानंतर तो फाटतो किंवा जिर्ण होतो किंवा पुसट होतो. त्यामुळे असे वाटते की, पीरिऑडिकल खर्च व रिप्लेसच व्हायला पाहिजे. तसेच जाहिरातीवर

किंवा प्रचार प्रसारासाठी किती खर्च केला जातो अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, सदरहू माहिती सध्या उपलब्ध नसून माहिती उपलब्ध करून सादर करण्यात येईल. धर्मादाय खाजगी रुग्णालयांमध्ये योजनेची माहिती एकाच ठिकाणी मिळविण्याकरिता पुणे जिल्ह्यातील प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांनी स्वतंत्र कक्ष सुरू केले आहे काय अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, होय, सर्व रुग्णालयांनी स्वतंत्र कक्ष सुरू केलेले आहेत.

दिनांक २७ ऑक्टोबर २०१६ रोजी रूग्णालयांच्या सर्व प्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाले आहे काय? याबाबत सविस्तर माहिती द्यावी. तसेच नियमीतपणे बैठका होत असतात काय अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, होय. नियमीतपणे बैठका होत असतात.

विधि व न्याय विभागाच्या दिनांक २२ जुलै २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हा समितीच्या मागील ३ वर्षात झालेल्या बैठकांचा तपशील वर्षनिहाय सादर करावा, त्याचप्रमाणे त्यामध्ये काही कार्यवाही करण्यात आलेली आहे काय अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, यासंदर्भात पूर्ण इतिवृत्त प्राप्त झालेले नाही. त्यासंदर्भातील बैठका सिनसीअरली व नियमीतपणे होत नाहीत, असे माझे मत आहे. महसूल विभागाच्या प्रायोरिटीज असतात. ही योजना मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई येथील रुग्णालयांसाठीच आहे. विदर्भामधील व उत्तर महाराष्ट्रामधील रुग्णालये चांगल्या स्थितीत नाहीत. यामध्ये समावेश असलेली काही रुग्णालये नागपूर मध्ये आहेत. यासंदर्भात ३ वर्षांचा तपशील पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, ठीक आहे.

जिल्हास्तरीय समितीने विभागीय आयुक्तांकडे त्यांचा अहवाल सादर केला आहे काय व त्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांनी काय कार्यवाही केली आहे अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, धर्मादाय आयुक्त कार्यालयात योजनेतील तरतुदीनुसार प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी बैठक घेतली जाते. तसेच या बैठकीचा अहवाल मुख्यालयाला आणि जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविला जातो. गेल्या ५ वर्षांमध्ये प्रत्येक महिन्याला बैठक घेण्यात आलेली आहे. तसेच प्रत्येक बैठकीचे कार्यवृत्त देखील आपल्याकडे आहे. जिल्हा समितीची बैठक प्रत्येक महिन्याला होत असते काय? अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, मॉनिटरिंग समितीची बैठक प्रत्येक महिन्याच्या शनिवारी घेतली जाते.

पुणे जिल्ह्यामध्ये जिल्हा समितीची बैठक प्रत्येक महिन्याला होत असून उक्त अहवाल विभागीय आयुक्तांकडे पाठविला जातो काय? अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, जिल्हा समितीची बैठक ३ महिन्यातून एकदा घेतली पाहिजे, परंतु पुणे जिल्ह्यामध्ये प्रत्येक महिन्याला बैठक घेतली जाते. जिल्हा समितीच्याबाबत जास्त सांगता येणार नाही. परंतु उच्च न्यायालयाने कलम १८ नुसार स्थापन केलेल्या मॉनिटरिंग कमिटीचा अहवाल मुख्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविला जातो. समितीने विचारले की, मॉनिटरिंग कमिटीचे अध्यक्ष कोण असतात त्यावर विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, मॉनिटरिंग कमिटीचे अध्यक्ष सह धर्मादाय आयुक्त हे असतात. तसेच समितीमध्ये सिव्हील सर्जन, जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी व हॉस्पिटल

असोशिएशनचा एक प्रतिनिधी नेमलेले असतात. तसेच जिल्हा स्तरीय समिती मध्ये ३ विधिमंडळ सदस्य, सहायक धर्मादाय आयुक्त असतात.

विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आदित्य बिर्ला रूग्णालय हे आदित्य बिर्ला फाऊंडेशन मार्फत चालविले जाते. परंतु त्यांनी आदित्य बिर्ला हेल्प लाईन कंपनी स्थापन करून त्या कंपनीला रूग्णालय चालविण्यास दिले. त्यांचे असे म्हणणे होते की, ही योजना आम्हाला बंधनकारक नाही किंवा आम्हाला ॲप्लीकेबल नाही. त्यावेळी श्री. डिगे सर पुणे येथेच होते. त्यांना नोटीस देण्यात आली व त्यांचे म्हणणे जाणून घेण्यात आले. तेव्हा असे लक्षात आले की, सदरहू जमीन आदित्य बिर्ला फाऊंडेशनला सवलतीच्या दरात गरिबांवर मोफत उपचार करण्यासाठी बनविण्यात येणाऱ्या रूग्णालयासाठी देण्यात आलेली आहे. सदरहू रूग्णालय २००६ मध्ये झालेले असून २०१५ पर्यंत काहीच केले नव्हते. परंतु राजश्री बिर्ला सारखे मोठमोठे लोक त्यामध्ये विश्वस्त पदावर होते. ते धर्मादाय आयुक्तांच्या नोटीसला काही जुमानत नसतील तर त्यावर त्यांनी सांगितले की, तुम्ही आदेश काढलेत, तर आम्ही उच्च न्यायालयामधून रद्द करून घेऊ. त्यांना सांगितले की, तुम्हाला काय करायचे ते करावे, परंतु याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. त्यांना बोर्डाने जागा दिली असल्यामुळे त्यांनी आमचे म्हणणे ऐकले पाहिजे, अशी आमची धारणा होती. यावर बरीच चर्चा झाल्यावर ते कॉम्प्रमाईज करण्यास तयार झाले. २०१५ पासून अंमलबाजवणी करण्यास तयार झाले. परंतु २००६ पासून अंमलबजावणी झाली पाहिजे, असे मी ठरविले होते. त्यांनी नियमाप्रमाणे २००६ पासून आतापर्यंत घेतलेली रक्कम खर्च करावी अशा, त्यांना सूचना देण्यात आल्या. ही रक्कम २००६ ते २०१५ पर्यंत १२ कोटी रूपये होते. तसेच २००६ पासून पिवळे रेशन कार्ड असलेल्या गोरगरीब रूग्णांकडून त्यांना लाभ न देता उपचारासाठी पैसे घेण्यात आलेल्या रुग्णांचे बील कमी करण्यात येऊन त्यांना परत देण्यात यावे, असे सांगण्यात आले. यासंदर्भात पिवळे रेशन कार्ड असलेल्या व उपचार घेतलेल्या रूग्णांबाबत वर्तमान पत्रामध्ये जाहीरात देऊन रूग्णांना नियमानुसार रक्कम परत करण्यात आली. एका शेतकऱ्याने जमीन विकून उपचाराची २८ लाख रूपये रक्कम रूग्णालयामध्ये भरली होती. आपल्या या धोरणामुळे ५ वर्षानंतर त्या शेतकऱ्याला २८ लाख रूपये परत मिळाले. परंतु आपली एवढी यंत्रणा असताना देखील अनेक रूग्ण लाभास पात्र असताना त्या शेतकऱ्याला शेतजमीन विकून उपचार घ्यावे लागले. परंतु आपण कठोरपणे अंमलबजावणी केली असती तर त्या शेतकऱ्याला हा लाभ मिळाला असता आणि त्याला शेती विकण्याची गरज भासली नसती तसेच असे अनेक शेतकरी असतील. त्यामुळे सदरहू २० जिल्ह्यांमध्ये स्मार्ट टीव्ही तातडीने बसविण्यात यावे व याबाबतची माहिती पुढील बैठकीच्या वेळी समितीला सादर करावी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, ठीक आहे.

बिर्ला हॉस्पिटलने लाभ देणे सध्या बंद केलेले आहे. समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, त्यामध्ये अशी ॲम्बीग्युटी राहिली होती की, राहिलेले १२ कोटी रूपये पूर्वीच्या लोकांसाठी अशा शब्द प्रयोग करण्यात आला होता. परंतु उच्च न्यायालयाच्या नियमानुसार एकूण उत्पन्नाच्या २ टक्के रक्कम रुग्णालयाच्या आय.पी.एफ. फंडामध्ये प्रत्यक्षात जमा करणे गरजेचे आहे व तशी नोटीस बिर्ला हॉस्पिटलला पाठविण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील सर्व धर्मादाय खाजगी रूग्णालयांच्या आय.पी.एफ. खात्यामधील अखर्चित निधी किती आहे, याची तपासणी केली जाते व प्रत्येक रूग्णालयाने किती रूग्णांवर किती उपचार केले जातात अशी समितीने विभागीय

साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, संकेत स्थळावर दररोज माहिती दिली जात असल्यामुळे त्यांच्याकडे किती रक्कम शिल्लक आहे, हे कळून येते.

तहसीलदार जामनेर यांनी श्री. सदाशिव पाटील यांना दिलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याच्या अनुषंगाने त्यांनी त्यांचा खुलासा धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांना सादर केला आहे काय अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, त्यांनी अजूनपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. त्यांच्या दाखल्याबद्दल थोडी शंका होती. यासंदर्भात त्यांच्याकडून सह्याद्री हॉस्पिटलकडे उपचार घेण्यात आले होते. हॉस्पिटलला असे वाटले की, सदर केलेला दाखला खोटा असल्यामुळे चौकशी करण्याचे अधिकार देण्याबाबत त्यांनी विनंती केली होती. चौकशीमध्ये असे आढळून आले की, सदरहू व्यक्ती एम.एस.ई.बी.चा सेवानिवृत्त कर्मचारी होता. मंत्रालयात अर्ज केल्यामुळे रुग्णाचे पैसे परत करण्याबाबत मंत्रालयामार्फत सांगण्यात आले होते.

योजनेंतर्गत एकाच रुग्णावर किती कालावधीसाठी किती खर्च करण्यात यावा, याबाबत आपले अभिप्राय काय आहेत. तसेच एका रुग्णावर रुग्णालयाच्या उत्पन्नाच्या २ टक्के रक्कम खर्च होईपर्यंत उपचार करण्यात येतात अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, होय. कॉर्पस संपेपर्यंत रक्कम खर्च करण्यात येते. एका प्रकरणाच्या वेळी आम्हाला विचारण्यात आले होते की, ९ लाख रुपये खर्च झाला असून निधी संपत आला आहे रुग्णावरील उपचार थांबविण्यात यावेत काय? त्यावर आम्ही सांगितले होते की, उपचार थांबविण्याची आवश्यकता नाही दुसरा रुग्ण घेण्याऐवजी पहिल्या रुग्णावर उपचार करण्यात यावा. काही कालावधीत आयुष्यमान भारत योजना कार्यान्वीत झाल्यानंतर ५ लाख रुपये मर्यादेपर्यंत उपचार करण्यासाठी ५० टक्के लोकांना लाभ देण्यात येणार आहे त्याचा फायदा रुग्णालयांना मिळणार आहे काय, अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, धर्मादाय रुग्णालयांना प्रोत्साहन देण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रामध्ये जे व्यक्ती चांगले काम करतील त्यांना उक्त पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. धर्मादाय रुग्णालयात किती लोकांनी उपचार घेतले, त्यावेळी त्यांना काही त्रास झाला का, याबाबी विचारात घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे.

राज्यातील धर्मादाय आयुक्तांच्या अखत्यारीतील सर्व रुग्णांलयामध्ये आरोग्य सेवक नियुक्त करण्यात आले तसेच महात्मा फुले आरोग्य अभियान योजनेतील लोकांना काढण्यात आले आहे काय अशी समितीने विभागीय साक्षीच्या वेळी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, सदरहू लोक कार्यरत असून ते त्यांच्या सूचनेनुसार काम करतात.

## अभिप्राय व शिफारशी

"धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी २०१६ रोजी पुणे येथील धर्मादाय खाजगी रुग्णालयांना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने रुग्णालयातील अनेक त्रुटी समितीच्या निर्दशनास आल्या या अनुषंगाने समितीची पुणे जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेण्यात आली. समितीने या दौऱ्याच्या वेळी जहांगीर नर्सिंग होम, संचेती हॉस्पिटल, के.ई.एम. हॉस्पिटल येथे दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला योजनेच्या माहितीचे डिजिटल फलक रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आले नसल्याचे तसेच सर्वच जिल्ह्यांमधील रुग्णालयांमध्ये डिजिटल फलक लावलेले नसल्याचेही वारंवार निदर्शनास आले. त्यामुळे या रुग्णालयांबरोबरच इतर जिल्ह्यांमध्ये देखील अशा प्रकारचे फलक व महाराष्ट्र विधानमंडळाने वेळोवेळी नियुक्त केलेल्या समिती सदस्यांची यादी (सदस्यांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक व ई मेल) सह दर्शनी भागात लावण्यात यावेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालये, महानगरपालिका, नगरपंचायती, जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, तहसीलदार, तलाठी, प्राथमिक आरोग्य केंद्रे व जिल्हा रुग्णालये इ. कार्यालयाच्या दर्शनी भागात या योजनेच्या सविस्तर महितीसंदर्भात फलक लावण्यात यावा. याची धर्मादाय कार्यालयाकडून शहानिशा करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.

या दौऱ्याच्या अनुषंगाने दिनांक १५ मे २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विभागीय प्रतिनिधींनी समितीला असे सांगितले की, प्रत्येक रुग्ण आय.पी.एफ. किंवा ई.डब्ल्यू.एस. यापैकी कोणत्या दर्जामधील आहे त्याप्रमाणे त्याच्या बेडवर फलक लावले जातात. याच्या अंमलबजावणीसाठी पत्र दिले होते व त्याची तपासणी देखील झाली आहे. तपासणीमध्ये लक्षात आले की, ज्या दर्जाचे रुग्ण आहे त्याच्या बेडला फलक लावले जात आहे. परंतु काही रुग्णालयांचे असे मत आहे की, अतिदक्षता विभागामधील रुग्णाच्या बेडला असे फलक लावू नये. दोन रुग्णांमध्ये त्यामुळे भेदभाव केला जातो. सदर रुग्ण आय.पी.एफ. दर्जामधील असल्याचे रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना देखील माहिती होते व त्यामुळे रुग्णाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. सर्वांना सारखेच उपचार मिळाले पाहिजेत हीच अपेक्षा आहे. उपचारांमध्ये दुर्लक्ष केल्याबाबत जर रुग्णाची तक्रार आली तर संबंधितांवर कडक कारवाई करावी तसेच प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने आय.पी.एफ.चे खाते बँकेत उघडून त्यात २% रक्कम भरणा करावी आणि त्याचा तपशील धर्मदाय कार्यालयातील संबंधीत अधिकाऱ्यांनी तपासावा. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.

समितीने असे विचारले की, जेव्हा समितीने रुबी हॉल क्लिनिकला भेट दिली होती तेव्हा रुबी हॉल क्लिनिकमध्ये निर्धन रुग्णाच्या निधी खात्यामध्ये ७ कोटी रुपये जमा असल्यासंदर्भाची व त्यानंतरच्या निधीची सद्यस्थिती काय आहे? सदर सर्व निधी त्यांनी खर्च केला असल्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी साक्षीच्या वेळेस सांगितले. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, अचानक ७ कोटी रुपये कसे खर्च करण्यात आले? आपण बैठक घेतली त्यावेळी पैसे होते, परंतु आता ते सर्व खर्च झाले आहेत. याबाबत समितीला आश्चर्य वाटत आहे. सबब, समितीच्या सूचनेप्रमाणे करण्यात आलेली चौकशी पूर्ण झाली असल्यास त्याबाबतची माहिती समितीला तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी व रुबी हॉल क्लिनिकबाबत समितीस शंका असल्यामुळे याबाबत योग्य ती कडक कार्यवाही धर्मादाय आयुक्तांमार्फत करण्यात यावी असे समितीचे निदेश असूनही अद्यापपर्यंत याबाबत कोणतीच कार्यवाही समितीला धर्मादाय आयुक्ताकडून कळविण्यात आलेली नाही व याबाबत झालेल्या विलंबाचा अहवालही समितीला तात्काळ सादर करण्यात यावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.

धर्मादाय खाजगी रुग्णालयाची तपासणी करणे यासंदर्भातील तदर्थ संयुक्त समितीचा दिनांक ४ व ५ फेब्रुवारी २०१६ रोजी पुणे येथील दौरा गेला असता सदर दौऱ्यात जिल्हास्तरावरील समितीतील जिल्हा शल्य चिकित्सक, उच्चाधिकार समितीतील सहायक संचालक, आरोग्य सेवा, मुख्य वैद्यकीय अधिकारी/प्रतिनिधी महानगरपालिका तसेच सहायक विक्रीकर आयुक्त हे समितीवरील सदस्य असूनही बैठकीस दोन्ही दिवस उपस्थित राहीलेले नाहीत ही अतिशय गंभीर बाब असून समितीने याबाबत आपली तीव्र नाराजी सचिवांच्या साक्षीत निदर्शनास आणून हे भूषणावह नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी असे समितीने सांगितले असता यापुढे समितीच्या दौऱ्याच्या वेळी तसेच साक्षीच्या वेळी संबंधीत अधिकारी संपूर्ण अद्ययावत माहिती घेऊन उपस्थित न राहिल्यास याची गंभीरतेने दखल घेऊन संबंधीतांवर योग्य ती कडक तसेच त्यांच्या सेवा पुस्तकामध्ये याबाबतची नोंद घेण्याची कार्यवाही शासनाने करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.

समितीने दौऱ्याच्या वेळी संबंधीत रुग्णालयांना निधीच्याबाबत विचारले असता रुग्णालयांनी समितीस असे विदित करण्यात आले की, नियमाप्रमाणे धर्मादाय रुग्णालयांनी एकूण रुग्णांच्या देयकाच्या २% रक्कम प्रत्येक महिन्याला निर्धन रुग्ण निधी खात्यात जमा करणे आवश्यक आहे व त्याचे वेगळे खाते असणे ही तितकेच महत्वाचे आहे. परंतु ही २% रक्कम खुपच कमी असल्यामुळे ती २% ऐवजी ४% करण्यात यावी. तसेच धर्मादाय खाजगी रुग्णालयांना येणारी विजेची बिले व पाण्याची बिले यामध्ये शासनाने काही प्रमाणात सवलत दिल्यास त्या रुग्णालयाच्याही अडचणी काही प्रमाणात कमी होतील. याबाबत शासनाने वरील दोन्ही बाबींचा साकल्याने विचार करून २% निधी ऐवजी रुगणालयाच्या उत्पन्नाच्या ४% आणि विज बिल व पाण्याचे बिल यातही काही प्रमाणात सवलत देण्याबाबत लक्ष घालावे व याबाबतचा अहवाल या सचिवालयास तात्काळ सादर करावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबतच्या केलेल्या कारवाईची माहीती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.

समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी पुणे जिल्ह्यातील रुग्णालयांना दिलेल्या भेटीच्या दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, काही रुग्णालये रुग्णांनी सादर केलेला तहसीलदाराचा दाखला, केशरी रेशनकार्ड व इतर कागदपत्रांची शहानिशा करण्यासाठी त्या रुग्णांना घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांची तसेच त्यांच्याकडे किती एकर जमीन तसेच त्याच्या नातेवाईकांची स्थावर मालमत्ता किती आहे याबाबतची चौकशी केल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगितल्यानंतर समितीने विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी अशा पद्धतीने एखाद्या रुग्णाची चौकशी करण्याचा अधिकार एखाद्या रुग्णालयाला आहे का अशी विचारणा केली असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, रुग्णालय प्रशासन रुग्णांच्या कागदपत्रांची तपासणी करू शकते परंतु, रुग्णांच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबियांची चौकशी करू शकत नाही. तसेच क्लॉज १५ मध्ये “The Charitable Hospital shall verify the economic status of the patient from their Medical Social Worker on the basis of scrutiny of any of the following documents produced by the concerned patient-certificate from Tahsildar, Ration Card ....” त्यावर समितीने On the basis of documents produced economic status of the patient will be verified by the Medical social worker of the Hospital विभागीय प्रतिनिधींनी समितीस वाचून दाखविले आणि रुग्णालय प्रशासनाकडून अशा प्रकारच्या तपासण्या करण्याची बाब सतत व्हायला नको यासाठी That patient’s economic status should not be left at the mercy of the Medical Social Worker of the concerned Hospital म्हणून अशी सुधारणा या क्लॉजमध्ये करण्याची आवश्यकता आहे व ही सुधारणा विधि व न्याय विभाग आणि धर्मादाय आयुक्त यांनी संयुक्तपणे अंमलात आणण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.

## गुरुवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०१६

समितीची बैठक शासकीय विश्रामगृह, पुणे येथे सकाळी १०-०० वाजता झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) डॉ. मिलिंद माने, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) श्री. भीमराव धोंडे, वि.स.स.

(३) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(५) श्री. डी. पी. सावंत, वि.स.स.

(६) डॉ. सतीश पाटील, वि.स.स.

(७) डॉ. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स.

(८) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अशोक मोहिते, सहसचिव (१)

(२) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(३) श्री. आशिष जावळे, कक्ष अधिकारी

**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे :**

(१) श्री. सौरभ राव, जिल्हाधिकारी

(२) श्री. राजेंद्र मुठे, निवासी उप जिल्हाधिकारी

(३) श्रीमती रोहिणी आखाडे, तहसीलदार (सर्वसाधारण शाखा) पुणे,

**धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. शिवकुमार डिगे, सह धर्मादाय आयुक्त

(२) श्री. नवनाथ जगताप, सहायक धर्मादाय आयुक्त,

(३) श्री. म. साजिद रचभरे, सहायक धर्मादाय आयुक्त

## शुक्रवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०१६

समितीची बैठक शासकीय विश्रामगृह, पुणे येथे सकाळी १०-३० व त्यानंतर दुपारी २-०० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे बैठक झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) डॉ. मिलिंद माने, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(४) श्री. डी. पी. सावंत, वि.स.स.

(५) डॉ. सतीश पाटील, वि.स.स.

(६) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स.

**जिल्हा स्तरीय समिती :**

श्री. राहूल कुल, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अशोक मोहिते, सहसचिव (१)

(२) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(३) श्री. आशिष जावळे, कक्ष अधिकारी.

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. एस. चौकलिंगम, आयुक्त

(२) श्रीमती कविता द्विवेदी, उप आयुक्त (सा. प्र.)

(३) श्रीमती मनिषा देशपांडे, तहसिलदार, (सा. प्र.).

**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे :**

(१) श्री. सौरभ राव, जिल्हाधिकारी,

(२) श्री. राजेंद्र मुंठे, निवासी उप जिल्हाधिकारी

(३) श्री. उ. म. पाटील, उप जिल्हाधिकारी (भूसंपादन)

(४) श्रीमती रोहिणी आखाडे, तहसीलदार (सर्वसाधारण शाखा) पुणे.

**धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. शिवकुमार डिगे, सह धर्मादाय आयुक्त

(२) श्री. नवनाथ जगताप, सहाय्यक धर्मादाय आयुक्त

(३) श्री. म. साजिद रचभरे, सहाय्यक धर्मादाय आयुक्त.

**जिल्हा सामान्य रुग्णालय, पुणे :**

(१) डॉ. संजय देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक.

**जिल्हा परिषद पुणे :**

(१) डॉ. मिलिंद चिटवार, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी

(२) डॉ. ए. व्ही. मोहोळक, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय, पुणे.

## मंगळवार, दिनांक १५ मे २०१८

समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे दुपारी ०२-०० वाजता झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) डॉ. रणजित पाटील, मा. विधि व न्याय राज्यमंत्री तथा समिती प्रमुख

(२) डॉ. मिलिंद माने, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) डॉ. शशिकांत खेडेकर, वि.स.स.

(५) श्री. डी. पी. सावंत, वि.स.स.

(६) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अशोक मोहिते, सहसचिव (१)

(२) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(३) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(४) श्री. सुनिल परब, कक्ष अधिकारी.

**विभागीय सचिव :**

(१) श्री. शिवकुमार डिगे, धर्मादाय आयुक्त

(२) श्री. शि. भ. कचरे, धर्मादाय सह-आयुक्त, पुणे

(३) श्री. न. वा. जगताप, धर्मादाय उप-आयुक्त, पुणे

(४) भ. प. व्यास, धर्मादाय उप-आयुक्त, मुख्यालय

(५) श्री. राजेंद्र द. सावंत, विधी-सल्लागार-नि-सह सचिव मंत्रालय, मुंबई.

**सोमवार, दिनांक ७ मार्च २०२२**

समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-०० वाजता झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्रीमती आदिती तटकरे, मा. विधि व न्याय राज्यमंत्री तथा समिती प्रमुख

(२) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.

(३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(४) श्री. अबू आजमी, वि.स.स.

(५) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.

(६) डॉ. रणजित पाटील, वि.प.स.

(७) श्री. प्रविण पोटे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव<br>उप सचिव (विधि पदाचा अतिरिक्त कार्यभार)

(३) श्री. सुनिल परब, कक्ष अधिकारी

समितीने सदरहू बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व संमत केला.

# मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वैद्यकीय उपचाराकरिता तयार केलेली योजना

# धर्मादाय रुग्णालयात/वैद्यकीय केंद्रात निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार

## धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३१ |
| २ | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१कक | ३३ |
| ३ | योजना (मराठी व इंग्रजी) | ३७ |
| ४ | निर्धन व दुर्बल घटकातील व्यक्तींच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा-अधिसूचना | ५० |
| ५ | शास्तीची (सुधारित) तरतूद-अधिसूचना | ५४ |
| ६ | विधान मंडळाची मा. तदर्थ संयुक्त समिती - ज्ञापन | ५७ |
| ७ | मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती शासन निर्णय | ५९ |
| ८ | धर्मादाय सह आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील तपासणी समिती व अपर मुख्य सचिव, आरोग्य यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती-शासन निर्णय | ६१ |
| ९ | तज्ज्ञ डॉक्टरांची समिती-शासन निर्णय | ६२ |
| १० | धर्मादाय रुग्णालय/वैद्यकीय केंद्रांची यादी व संपर्क दूरध्वनी क्रमांक | ६४ |
| ११ | जिल्हा कार्यालयांची संपर्क दूरध्वनी क्रमांकाची यादी | १४५ |
| १२ | अधिसूचना दि. २९ जून २०१९ | १४७ |

-: <u>प्रस्तावना</u> :-

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था संचालित धर्मादाय रूग्णालये/वैद्यकीय केंद्रें येथे निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांना मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार उपलब्ध करण्याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम चे कलम ४१ क क हे दिनांक ०१/०८/१९८६ पासून अंमलात आलेले आहे.

श्री. गजानन पुनाळेकर हे सेवानिवृत्त गिरणी कामगार होते. त्यांना निवृत्ती वेतन किंवा निश्चित आर्थिक उत्पन्न नव्हते व ते कमी आर्थिक उत्पन्न असलेल्या कामगारांच्या चाळीत राहत होते. दिनांक १०/०८/२००४ रोजी त्यांचे पोटात दुखू लागल्यामुळे ते जसलोक रूग्णालय, मुंबई येथे उपचाराकरीता गेले. त्यांनी सदर रूग्णालयात असलेल्या मोफत उपचार सवलतींबाबबत विचारणा केली. परंतु, त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही. तसेच त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याकरीता कोणीही जबाबदार व्यक्ती तेथे हजर नव्हती.

सदर घटनेबाबत श्री. गजानन पुनाळेकर यांचा मुलगा श्री. संजीव गजानन पुनाळेकर यांना समजल्यानंतर त्यांनी दिनांक ११/०८/२००४ रोजी जसलोक रूग्णालय व इतर चार धर्मादाय रूग्णालयांना पत्र पाठवून गरीब रूग्णांकरीता मोफत व सवलतीच्या दराने देण्यात येणा-या उपचाराबाबत माहिती विचारली. परंतु, सदर पत्रांना उत्तरे मिळाली नाहीत. अशा परिस्थितीत श्री. संजीव गजानन पुनाळेकर यांनी समाजातील गरीब रूग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दराने धर्मादाय रूग्णालयांत उपचार मिळण्यासाठी दिशानिर्देश निर्गमित करण्याकरीता व त्याबाबत योजना तयार करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ३१३२/२००४ दाखल केली होती.

सदर याचिकेवर सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती नेमली होती. सदर समितीच्या शिफारशींवरून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम चे कलम ४१ क क अंतर्गत व्याख्यित धर्मादाय रूग्णालये/वैद्यकीय केंद्रे येथे निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांना वैद्यकीय उपचार अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दराने उपलब्ध व्हावे याकरीता योजना तयार केलेली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी तयार केलेल्या योजनेचे ठळक वैशिष्ट असे आहे की, प्रत्येक धर्मादाय रूग्णालयाने निर्धन रूग्ण निधी निर्माण करावा व सदर निधीमध्ये एकूण देय रूग्णांच्या देयकांच्या स्थुल रकमेच्या २ टक्के रक्कम कोणतीही वजावट न करता जमा करावी. सदर २ टक्के जमा रकमेतुन संबंधीत धर्मादाय रूग्णालयाने निर्धन व आर्थिक दुर्बल घटकातील रूग्णांवर उपचार करावेत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे समोरील सदर याचिका क्रमांक ३१३२/२००४ वर दिनांक १५ एप्रिल २००९ रोजी अंतिम निर्णय झालेला आहे. सदर योजना ही दिनांक १ सप्टेंबर २००६ पासून अंमलात आलेली आहे.

धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय

## महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाचे कलम ४१ क क

### मोफत किंवा सवलतीच्या दरानी उपचार करावयाच्या गरीब रुग्णांकरीता विवक्षित खाटा राखून ठेवण्यासाठी रुग्णालये इत्यादिंना निदेश देण्याचा धर्मादाय आयुक्तांचा व राज्य शासनाचा अधिकार.

**४१ क क (१)** त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा विश्वस्त व्यवस्थेच्या कोणत्याही लेखात किंवा कोणत्याही करारात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या धर्मादाय आयुक्तांच्या किंवा इतर सक्षम प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याचा वार्षिक खर्च पाच लाख रुपयापेक्षा किंवा राज्य शासन, गरीब वर्गास अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा मोफत किंवा सवलतीच्या दरांनी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राजपत्रातील अधिसूचनेव्दारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा अन्य मर्यादेपेक्षा अधिक असेल अशा, राज्य सहाय्यित कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या बाबतीत, धर्मादाय आयुक्ताने किंवा राज्य शासनाने, रुग्णालय (कोणतेही शुश्रुषालय, किंवा प्रसुतिगृह यासह), दवाखाना किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कोणतेही इतर केंद्र (यात यापुढे ज्याचा निर्देश " वैद्यकीय केंद्र " असा करण्यात आला आहे) चालवणा-या अशा कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्तांस किंवा त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तीस पुढीलपैकी सर्व किंवा कोणतेही निर्देश देणे विधिसंगत असेल.

(क) उपलब्ध जागा व सुविधा लक्षात घेऊन कोणत्याही व्यक्तीला धर्म, वंश, जात, स्त्री- पुरुष भेद, जन्मस्थळ, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव भेदभाव न करता वैद्यकीय केंद्रातील प्रवेश कोणत्याही व्यक्तीस खुला असेल.

परंतु, एखादे वैद्यकीय केंद्र केवळ महिलांसाठीच असेल त्याबाबतीत, अशा केंद्रात कोणत्याही पुरुषावर उपचार करण्याची सक्ती केली जाणार नाही.

(ख) ज्यांची यथास्थिती वैद्यकीयदृष्टया विनामूल्य तपासणी करण्यात येईल आणि ज्यांच्यावर उपचार करण्यात येतील व ज्यांना रुग्णालयात दाखल करुन घेण्यात येईल अशा दाखल होऊ इच्छिणा-या किंवा उपचार घेऊ इच्छिणा-या निर्धन रुग्णांसाठी निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने वैद्यकीय केंद्राच्या प्रत्येक विभागात वैद्यकीय तपासणी आणि उपचार यासाठी अशा वैद्यकीय केंद्रावर उपचार करण्यात यावयाच्या रुग्णांच्या एकूण संख्येच्या १० टक्के आणि वापरातील खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आरक्षित ठेवणे आणि राखून ठेवणे.

(ग) राज्य शासन आपल्याकडून चालविण्यात येणा-या तत्सम वैद्यकीय केंद्रावर आकारलेले दर विचारात घेऊन वेळोवेळी सामान्य किंवा विशेष आदेशांव्दारे ठरवील असे दर ज्यांना

आकारण्यात येतील आणि वैद्यकीय तपासणी करण्यासाठी आणि उपचार करुन घेण्यासाठी रुग्णालयात प्रवेश घेऊ इच्छिणा-या अशा समाजातील दुर्बल घटकातील लोकांसाठी, निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने वैद्यकीय केंद्रांच्या प्रत्येक विभागात वैद्यकीय तपासणी आणि उपचार यासाठी अशा वैद्यकीय केंद्रावर उपचार करण्यात यावयाच्या रुग्णांसाठीच्या खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आणि वापरातील खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आरक्षित ठेवणे व राखून ठेवणे .

(घ) निदेशांमध्ये किंवा तद्न्वये काढलेल्या कोणत्याही सामान्य/किंवा/विशेष आदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर आनुषंगिक किंवा पूरक आवश्यक गोष्टीचे अनुपालन करणे.

परंतु , वर उल्लेखिलेल्या एखादा निदेश देताना, धर्मादाय आयुक्त, कोणत्याही वैद्यकीय केंद्रावर यापूर्वीच उपलब्ध असलेलया सोयी विचारांत घेईल आणि अशा सोयींची उपलब्धता विचारात घेऊन, जर एखादी सोय खंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या टक्केवारीशी सुसंगत असल्यास तिच्या अधीन राहून योग्य ते निदेश देईल.

(२) (क)पोट कलम १ अन्वये दिलेल्या निदेशांच्या अंमलबजावणीची खात्री करुन घेण्यासाठी, राज्य शासनाने याबाबतीत यथाचितरित्या प्राधिकृत केलेल्या अधिका-याने किंवा धर्मादाय आयुक्ताने किंवा त्याने याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधीमार्फत कोणत्याही वैद्यकीय केंद्राला भेटी देणे, त्याचे निरीक्षण करणे आणि त्यांच्याकडून नियतकालिक अथवा अन्य विवरणपत्रे मागविणे हे विधीसंमत असेल.

(ख) पोट कलम (१) अन्वये दिलेल्या एखादया निदेशाच्या पालन करणे आणि खंड (क) अन्वये अशा निदेशांच्या अंमलबजावणीची पडताळणी करण्यासाठी उक्त अधिका-यास किंवा धर्मादाय आयुक्तास किंवा त्यांच्या प्रतिनिधीस आवश्यक असलेल्या योग्य त्या सर्व सोयी पुरविणे, उपलब्ध करुन देणे आणि सहकार्य देणे आणि त्याखाली गरजांचे अनुपालन करणे हे, अशा केंद्राच्या प्रत्येक विश्वस्ताचे किंवा अशा वैद्यकीय केंद्राशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

(ग) पोट कलम (१) अन्वये दिलेल्या एखाद्या निदेशाच्या संबंधात निर्वचन, अंमलबजावणी किंवा इतर कोणत्याही बाबीसंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास ते प्रकरण योग्य निदेशांसाठी , धर्मादाय आयुक्तांमार्फत राज्य शासनाकडे पाठविण्यांत येईल.

(३) ज्या शर्तीस अधीन राहून, अशा राज्य सहाय्यित विश्वस्तव्यवस्थेनेपोट कलम (४) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही अनुदान, सूट किंवा सवलत, इत्यादीची तरतूद केली असेल किंवा तो तिला अन्यथा मिळाली असेल, अशा शर्तींच्या आधारे राज्य सहाय्यित विश्वस्तव्यवस्थेने ज्या सोयींची तरतूद केली आहे अशा कोणत्याही स्वरुपाच्या वैद्यकीय सोयींना प्रतिकूल होईल अशा त-हेने कलमे (१) व (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा येणार नाही आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) अधिनियम १९८४ च्या प्रारंभाच्या दिनांकास अंमलात असलेल्या वैद्यकीय सोयी जरी त्या आरक्षित केलेल्या आणि राखून ठेवलेल्या प्रकाराच्या टक्केवारीपेक्षा अधिक असल्या तरी त्या पूर्वीप्रमाणेच चालू राहतील.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ -

(क) " राज्य सहाय्यित सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था " म्हणजे, केवळ वैद्यकीय सहाय्यासाठी, असलेली किंवा वैद्यकीय सहाय्य व इतर धर्मादाय प्रयोजनासाठी असलेली आणि जी (कोणतेही शुश्रुषालय किंवा प्रसूतिगृह यांसह) एखादे रुग्णालय, दवाखाना किंवा अन्य एखादे वैद्यकीय उपचार केंद्र चालवीत असेल आणि जिला –

(एक) राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून नाममात्र किंवा सवलतीच्या दराने, एखादी जमीन किंवा इमारत, मालकीहक्काच्या तत्वावर किंवा भाडेपट्टयाने किंवा संमती-नि-परवाना तत्वावर मिळालेली आहे, किंवा

(दोन) राज्य शासनाकडून नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६, याच्या कलम २० किंवा २१ खाली कोणतीही रिकामी जमीन धारण करणे चालू ठेवण्यात सूट किंवा चालू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे, किंवा

(तीन) जिला कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनार्थ, विकास नियंत्रण नियम यात भरपूर सवलत किंवा त्यातून सूट दिलेली आहे किंवा ते शिथिल केलेले आहेत, किंवा

(चार) जिला राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून कोणतेही कर्ज किंवा हमी किंवा कोणतेही अनावर्ती सहायक अनुदान किंवा अन्य कोणतेही वित्तीय सहाय्य मिळालेले आहे अथवा कोणतेही आवर्ती सहायक अनुदान किंवा अन्य वित्तीय सहाय्य मिळत आहे अशी विश्वस्त व्यवस्था,

(ख) "निर्धन व्यक्ती" म्हणजे, जिचे एकूण वार्षिक उत्पन्न तीन हजार सहाशे रुपयांहून किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे वेळोवेळी, विनिर्दिष्ट करील अशा अन्य मर्यादाहून अधिक

नसेल अशी व्यक्ती.

(ग) "समाजातील दुर्बल घटकातील व्यक्ती " म्हणजे, जी निर्धन नाही, परंतु, जिचे उत्पन्न दरसाल पंधरा हजार रुपयांहून किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करील अशा मर्यादेहून अधिक नसेल अशी व्यक्ती.

(घ) पोट कलम (१) अन्वये आरक्षित केलेल्या किंवा राखून ठेवलेल्या टक्केवारीतील रुग्ण म्हणून रुग्णाला प्रवेश देण्यापूर्वी किंवा त्यांच्यावर उपचार करण्यापूर्वी त्याप्रयोजनार्थ ठेवलेल्या नोंदवहीमधील विहित नमुन्यामध्ये, यथोचितरित्या पडताळणी केलेल्या आणि नोंद केलेल्या रुग्णाच्या प्रकाराची नोंद घेणे हे, प्रत्येक वैद्यकीय केंद्राच्या नियामक मंडळाचे (मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) कर्तव्य असेल. जर रुग्णाच्या प्रकाराविषयी वाद निर्माण झाल्यास ते प्रकरण योग्य निदेशांसाठी धर्मादाय आयुक्तांकडून राज्य शासनाकडे पाठविण्यांत येईल.

(५) या कलमाच्या पुर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, ज्या व्यक्तीला नसबंदी शस्त्रक्रिया किंवा ज्या व्यक्तीला, राज्य शासनाने या बाबतीत विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय उपचार करुन घ्यावयाचे आहेत, अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही रुग्णालयात किंवा अन्य वैद्यकीय उपचार केंद्रात, या कलमान्वये आरक्षित केलेल्या किंवा वेगळया किंवा राखून ठेवलेल्या खाटासंबंधात दाखल करुन घेण्याचा हक्क असणार नाही आणि तिला तशी परवानगी असणार नाही.

----------------*****------------------

**टिप** :- उपरोक्त कलमामध्ये विनिर्दीष्ट केलेली निर्धन व दुर्बल घटकांतील व्यक्तींच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ही दिनांक 23/02/2018 च्या अधिसुचनेनुसार सुधारित करण्यांत आलेली आहे.

## मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट याचिका (पीआयएल) क्रमांक ३१३२/२००४ मधील दिनांक १७/८/२००६ व दिनांक १५/४/०९ चे आदेशाप्रमाणे मंजूर योजनेचे मराठी भाषांतर

# योजना

१. मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (मुं.सा.वि.अधिनियम १९५०) मधील तरतुदींखाली नोंद झालेले सार्वजनिक धर्मादाय न्यास जे धर्मादाय रुग्णालय ज्यामध्ये शुश्रुषालय / प्रसूतिगृह/दवाखाना किंवा वैद्यकीय मदत देणारे इतर केंद्र यांचा समावेश आहे, चालवित आहेत आणि ज्यांचा वार्षिक खर्च हा रुपये पाच लाखा पेक्षा जास्त आहे ते कलम ४१ क क च्या खंड (४)च्या अंतर्गत " शासकीय अनुदानित सार्वजनिक न्यास " आहेत.

२. वरील खंड १ अंतर्गत जे सार्वजनिक धर्मादाय न्यास येतात त्यांचे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाचे कलम ४१ क क च्या तरतुदींन्वये कायदेशीर उत्तरदायित्व असे आहे की, त्यांनी कार्यान्वित असलेल्या खाटांच्या संख्येपैकी १० टक्के खाटा निर्धन रुग्णांसाठी मोफत उपचाराकरीता आरक्षित ठेवून सदर उद्देशांकरीताच राखून ठेवणे आणि एकूण कार्यान्वित असलेल्या खाटांच्या संख्येपैकी १० टक्के खाटा दुर्बल घटकातील रुग्णांसाठी सवलतीच्या दराने उपचाराकरीता आरक्षित ठेवून सदर उद्देशांकरीताच राखून ठेवणे.

३. तातडीच्या वेळी धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णास ताबडतोब दाखल करुन घ्यावेच आणि रुग्ण स्थिर होईपर्यंत, त्यास प्राण वाचविण्याकरीताचे सर्व तातडीचे उपचार आणि प्रक्रिया याकरीताच्या अत्यावश्यक वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात . तसेच आवश्यकता वाटल्यास, त्यांना त्यापुढे सार्वजनिक

रुग्णालयात नेण्याकरिता वाहतुकीची सुविधा पुरवावी. तातडीचे रुग्ण म्हणून दाखल करुन घेताना, धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णाकडून कोणतीही अनामत रक्कम मागू नये.

४. प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांनी "निर्धन रुग्णांचा निधी " (आयपीएफ) असा स्वतंत्र निधी निर्माण करावा व त्यात (निर्धन व दुर्बल घटकातील रुग्ण सोडून) इतर सर्व रुग्णांच्या स्थूल देयकांच्या त्याच्या दोन टक्के रक्कम कोणतीही वजावट न करता जमा करावी.

५. व्यक्ती किंवा इतर धर्मादाय न्यास किंवा इतर कोणत्याही मार्गाने निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना वैद्यकिय उपचार देण्याकरीता धर्मादाय रुग्णालयांना प्राप्त होणा-या देणग्या हया निर्धन रुग्णांच्या निधी खात्यामध्ये जमा कराव्यात.

६. निर्धन रुग्णांच्या निधीचे (आयपीएफ ) खाते निर्धन रुग्णांचा निधी (आयपीएफ) या शीर्षाखाली राखून ठेवावे आणि ते वार्षिक ताळेबंदामध्ये दाखविण्यात यावे ( मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ चे नियम ७ (१) अनुसूची ८).

७. निर्धन रुग्णांच्या निधी (आयपीएफ) खात्यामध्ये जमा होणारी रक्कम ही संबंधित धर्मादाय रुग्णालयाच्या स्वाधीन राहील व यानंतर तरतूद केल्याप्रमाणे त्या रक्कमेचा विनियोग फक्त निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना वैद्यकिय उपचार देणेकरीताच करावा लागेल.

८. धर्मादाय रुग्णालयांनी खाली नमूद केलेल्या ना देयक सेवा निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत द्याव्यात :-

अ) खाट

ब) निवासी वैद्यकिय अधिकारी सेवा

क) शुश्रृषा

ड) अन्न (रुग्णालय जर पुरवीत असेल तर )

इ) कापड

ई) पाणी

उ) वीज

ऊ) सर्वसाधारण विशेष उपचाराकरिता आवश्यक असलेल्या नित्य निदान विषयक सेवा

ए) हाऊस किपिंग सेवा

९. निर्धन रुग्णांचे बाबतीत धर्मादाय रुग्णालयांनी प्रत्येक विभागातील वैद्यकीय तपासणी व उपचार पूर्णपणे मोफत द्यावयाचे आहेत. निर्धन रुग्णाचे देयकात ज्या सेवांची किंमत आकारलेली आहे अशा सेवा त्या रुग्णालयांतील सर्वात खालच्या वर्गासाठी असलेल्या दराने आकाराव्या लागतील. औषधे, उपयोगात आणलेल्या वस्तु (कंझ्युमेबल्स) व शरिराच्या आत लावलेल्या वस्तु (इम्प्लांटस्) याचा आकार हा रुग्णालयांनी खरेदीच्या किंमतीत लावावा. जर डॉक्टरांनी त्यांच्या मेहनताऩ्यात सूट दिली असेल तर असा मेहनताना अंतिम देयकांमध्ये (बील) समाविष्ट करु नये. अशा प्रकारे तयार करण्यात आलेले देयक हे निर्धन रुग्णांच्या निधी खात्यातून खर्ची घालावे. धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन रुग्णांना दाखल करुन घेताना कोणतीही अनामत रक्कम मागू नये.

१०. दुर्बल घटकातील रुग्णाचे बाबतीत धर्मादाय रुग्णालयांनी प्रत्येक विभागातील वैद्यकिय तपासणी व उपचार सवलतीच्या दराने द्यावयाचे आहेत. दुर्बल घटकातील रुग्णाचे देयकास ज्या सेवांची किंमत आकारलेली आहे अशा सेवा त्या रुग्णालयातील सर्वात खालच्या वर्गाच्या रुग्णांसाठी असलेल्या दराने आकाराव्या लागतील. औषधे, उपयोगात आणलेल्या वस्तु (कंझ्युमेबल्स) व शरिराच्या आंत लावलेल्या

वस्तु (इम्प्लांटस्) यांचा आकार हा रुग्णालयांनी खरेदीच्या किंमतीत लावावा. मात्र दुर्बल घटकातील रुग्णांना औषधे, उपयोगात आणलेल्या वस्तु (कंझ्युमेबल्स) व शरिराच्या आंत लावलेल्या वस्तु (इम्प्लांटस्) यांच्या देयकांची निदान पन्नास टक्के रक्कम द्यावी लागेल. जर डॉक्टरांनी त्यांचा मेहनतान्यात सूट दिली असेल तर असा मेहेनताना अंतिम देयकामध्ये (बिल) समाविष्ट करु नये. अशा प्रकारे तयार करण्यात आलेले देयक हे , दुर्बल घटकातील रुग्णांनी अदा केलेली रक्कम वजा करुन, निर्धन रुग्णांच्या निधी खात्यातून खर्ची घालावे.

११. धर्मादाय रुग्णालयांनी सर्व रुग्णांच्या देयकाच्या दोन टक्के रक्कम (निर्धन रुग्ण व दुर्बल घटकातील रुग्णांची देयके वगळून) प्रत्येक महिन्याला प्रत्यक्षात निर्धन रुग्णाच्या निधी खात्यामध्ये जमा करावी. निर्धन रुग्णांच्या निधी खात्यामध्ये उपलब्ध असणारी रक्कम ही जास्तीत जास्त निर्धन रुग्ण व दुर्बल घटकातील रुग्णांना वैद्यकिय उपचार देणेकरीता खर्च करावी जर एखादया महिन्यात निर्धन रुग्णांच्या निधी खात्यामध्ये अधिक किंवा तूट असेल तर ते येणा-या पुढील महिन्यात जुळवून घ्यावे. जर निर्धन रुग्णांच्या निधी खात्यातील जमा व निर्धन रुग्ण आणि दुर्बल घटकातील रुग्णांच्या उपचाराकरीता येणा-या खर्चास सहा महिन्यापेक्षा जास्त काळ असमतोलपणा असेल, तर त्या धर्मादाय रुग्णालयाने ही बाब देखरेख समितीच्या (मॉनिटरींग कमिटी) निदर्शनास आणून द्यावी की जेणेकरुन देखरेख समिती योग्य ते निर्देश सदरहू धर्मादाय रुग्णालयास देवू शकतील.

१२.धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन रुग्णांच्या निधी खात्यामध्ये गोळा केलेली रक्कम निर्धन रुग्ण व दुर्बल घटकातील रुग्णांचेवर केलेला उपचार आणि वैद्यकिय समाज सेवक (मेडिकल सोशल वर्कर) यांनी तयार केलेले त्यांचे प्रकरण/रुपरेषा आणि प्रत्येक रुग्णांवर झालेल्या खर्चाची रक्कम यांची माहिती

धर्मादाय आयुक्त कार्यालयात मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ चे नियम २५ अे अन्वये द्याव्या लागणा-या माहितीसोबत सादर करावी.

१३. धर्मादाय रुग्णालयाच्या विश्वस्तांनी त्यांच्या नातेवाईकांना, न्यासाच्या कर्मचा-यांना किंवा त्यांचेवर अवलंबून असणा-या "निर्धन व दुर्बल घटकातील रुग्ण " या वर्गाखाली कोणतीही वैद्यकिय सुविधा देवू नये.

१४. धर्मादाय रुग्णालयांना, त्यांचेकडे इतर स्त्रोतांमार्फत अथवा सरकारी रुग्णालये, नगरपालिका रुग्णालये वगैरे यांचेमार्फत आलेल्या निर्धन अथवा दुर्बल घटकातील रुग्णांना दाखल करुन घ्यावे लागेल.

१५. धर्मादाय रुग्णालये त्यांच्याकडे कार्यान्वीत असलेल्या खाटांपैकी दहा टक्के खाटा (बेड)/सरासरी व्याप्त खाटांचे मर्यादेपर्यंत निर्धन रुग्णांना वैद्यकिय तपासणी व उपचारासाठी दाखल करुन घेतील. तसेच धर्मादाय रुग्णालये वरील खंड १४ प्रमाणे त्यांच्याकडे येणा-या दुर्बल घटकांतील रुग्णांना त्यांचेकडे कार्यान्वित असलेल्या खाटापैकी दहा टक्के खाटा/सरासरी व्याप्त खाटांचे मर्यादेपर्यंत वैद्यकीय तपासणी व औषधोपचारासाठी दाखल करुन घेतील. धर्मादाय रुग्णालये, रुग्णांचा आर्थिक दर्जा त्यांचेकडील वैद्यकीय समाजसेवक (मेडिकल सोशल वर्कर) यांच्याकरवी संबंधित त्या रुग्णांनी सादर केलेल्या खालीलपैकी एका कागदपत्राचे आधारे काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर पडताळणी करतील (१) तहसिलदार यांचे प्रमाणपत्र (२) शिधापत्रिका/ दारिद्रय रेषेखालील पत्रिका.

१६. बृहन्मुंबई विभागासाठी देखरेख समितीचे (मॉनिटरिंग कमिटी) सदस्य हे खालीलप्रमाणे असतील.

१. धर्मादाय सह आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (अध्यक्ष)

२. सह संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकिय), मुंबई (सदस्य सचिव)

३. मुंबई मधील रुग्णालयांच्या संघटनेचा सचिव किंवा नामनिर्देशित व्यक्ती (सदस्य)

४. आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई (सदस्य)

जिल्हा स्तरावरील देखरेख समिती (मॉनिटरींग कमिटी) खालीलप्रमाणे असेल.

१. धर्मादाय सह आयुक्त (विभागीय स्तर) किंवा त्यांचा प्रतिनिधी (अध्यक्ष)

२. जिल्हा शल्य चिकित्सक (सदस्य सचिव)

३. जिल्हा परिषदेचा आरोग्य अधिकारी (सदस्य)

४. जिल्हयातील धर्मादाय रुग्णालयांचा प्रतिनिधी (सदस्य)

१७ देखरेख समिती (मॉनिटरींग कमिटी) महिन्यातून एकदा सभा घेईल व प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाकडून करीत असलेल्या योजनेच्या अंमलबजावणीची देखरेख करेल. रुग्णांच्या काही गा-हाणी असतील तर देखरेख समिती त्याचा विचार करेल व त्याचा अहवाल धर्मादाय आयुक्त यांना करेल.

१८. जर धर्मादाय रुग्णालयाने या योजनेचे उल्लंघन केले आणि/किंवा कलम ४१ क क मधील तरतुदींचे उल्लंघन केले तर मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ६६ अन्वये दंडाची जी तरतूद आहे. त्या व्यतिरिक्त धर्मादाय आयुक्त अशा धर्मादाय रुग्णालयाबाबतीत त्यांना दिलेल्या सार्वजनिक प्रशासन निधीत भरावयाच्या अंशदानाची सूट पुढील वर्षापासून काढून घेण्यासाठी व संबंधित रुग्णालयाकडून सार्वजनिक न्यास प्रशासन निधीत भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेच्या वसुलीबाबत राज्य शासनाकडे अहवाल देवून शिफारस करतील. तसेच धर्मादाय आयुक्त अशा रुग्णालयाला देण्यात आलेल्या अन्य सवलती/ फायदे काढून घेण्यासाठी शासनाकडे विनंती करु शकतील.

१९. ज्या धर्मादाय रुग्णालयांना योजनेमधील उद्दीष्टे/उत्तरदायित्वे यांचे पालन करण्यामध्ये काही वैयक्तिक अडचणी आल्या तर त्यांना धर्मादाय आयुक्त यांचेकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज करण्याची मुभा राहील व धर्मादाय आयुक्त जर तसे प्रकरण आढळून आले तर अशा वेळी योग्य ते बदल करावयाचा विचार करु शकतील.

२०. धर्मादाय आयुक्त यांनी बृहन्मुंबई विभागातील धर्मादाय रुग्णालयांची यादी त्यांचे सूचना फलकावर लावावी आणि बृहन्मुंबईमधील दोन जास्त खप असलेल्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करावी ज्यामध्ये एक मराठी आणि दुसरे इंग्रजी वर्तमानपत्र असावे. आणि प्रत्येक जिल्हयातील धर्मादाय रुग्णालयांची यादी धर्मादाय सह आयुक्त कार्यालयातील सूचना फलकावर लावावी आणि दोन जास्त खप असलेल्या जिल्हयाच्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

२१. सदर योजने अंतर्गत येणा-या प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्या रुग्णालयाच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर योजना प्रदर्शित करावी.

-----------***-----------

**तळ टिप** :- उपरोक्त मराठी भाषांतर हे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेच्या मूळ इंग्रजी योजनेनुसार केलेले आहे. तथापि, सदर योजनेतील तरतुदींच्या निर्वचनाबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास मा. उच्च न्यायालयाच्या इंग्रजी भाषेत असलेल्या योजनेचे अवलोकन करावे.

अधिक माहितीकरीता धर्मादाय आयुक्तालयाचे charity.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ पहावे.

# SCHEME

1. The public Charitable Trusts registered under the provisions of the Bombay Publics Trusts Act, 1950 (for short 'B.P.T.Act') which are running Charitable Hospital, including nursing home or maternity home, dispensaries or any other center for medical relief and whose annual expenditure exceeds Rs.5 Lacs are "State aided public trust" within the meaning of clause 4 of section 41AA.

2. The public Charitable Trust covered by aforesaid clause 1 shall be under legal obligation to reserve and earmark 10% of the total number of operational beds for indigent patients and provide medical treatment to the indigent patients free of cost and reserve and earmark 10% of the total number of operational beds at concessional rate to the weaker section patients as per the provisions of section 41AA of the B. P. T. Act.

3. In emergency, the Charitable Hospitals must admit the patient immediately and provide to the patient "Essential Medical Facilities" for all life saving emergency treatment and procedure till stabilization. Further transportation to the public hospital would be arranged by such Charitable Hospital, if necessary. The Charitable Hospital, shall not ask for any deposit in case of admission of emergency patients.

4. That each public Charitable hospital shall create separate fund which may be called Indigent Patients' Fund (for the sake of brevity, hereinafter referred to as "IPF") and shall credit two per cent of gross billing of all patients (other than indigent and weaker section patients) without any deduction.

5. Donations that may be received by the charitable hospitals from individuals or other charitable trusts or from any other source for providing medical treatment to the indigent and weaker section patients shall be credited to IPF Account.

6. The account of IPF shall have to be earmarked under the head of IPF and same shall be reflected under the earmarked fund in the annual balance Sheet (Schedule VIII Rules 7(1) of the B.P.T Rules).

7. The amount credited to the IPF Account shall remain at the disposal of the respective Charitable Hospital and that amount shall be utilized only for providing medical treatment to the indigent and weaker section patients as provided herein after.

8. The Charitable Hospitals shall provide following non billable services free to the indigent patients as well as weaker section patients--

(a) Bed
(b) RMO Services
(c) Nursing Care
(d) Food (if provided by the hospital)
(e) Linen
(f) Water
(g) Electricity and
(h) Routine Diagnostics as required for treatment of general specialties.
(I) House Keeping Services.

9. In case of indigent patients, the Charitable Hospitals shall provide medical examination and treatment in its each department totally free of cost. The indigent patient's bill of billable services shall be prepared at the rates applicable to the lowest class of the respective hospital. The medicines, consumables and implants are to be charged at the purchase price to the hospital. If Doctors forego their charges, then the same shall not be included in the final bill of the indigent patients. The bill so prepared shall be debited to IPF Account. The Charitable Hospitals shall not ask for any deposit in case of admission of

indigent patients.

10. In case of weaker section patients, the Charitable Hospitals shall provide medical examination and treatment in its each department at concessional rates. The weaker section patient's bill of billable services shall be prepared at the rates applicable to the lowest class of the respective hospital. The medicines, consumables and implants are to be charged at the purchase price to the hospital, however the weaker section patients shall pay at least 50% of the bills of medicines, consumables and implants. If Doctors forego their charges, then the same shall not be included in the final bill of the weaker section patients. The bill so prepared after deducting the payment made by the weaker section patients shall be debited to IPF Account.

11. The Charitable Hospitals shall physically transfer 2% of the total patients' billing (excluding the bill of indigent and weaker section patients) in each month to IPF Account. The amount available in the IPF Account shall be spent to provide medical treatment to maximum number of indigent and weaker section patients. In case of surplus or shortfall in the IPF Account of the month, the same shall get adjusted in the subsequent months. In case there is imbalance in the credit of the IPF Account and the expenditure incurred in the treatment of indigent and weaker section patients for more than six months, such Charitable Hospital may bring this aspect to the notice of the Monitoring Committee who may issue appropriate directives to the concerned hospital.

12. The Charitable Hospitals shall furnish information to the office of the Charity Commissioner regarding the amount collected in the IPF Account, treatment provided to the indigent patients and the weaker section patients and their profiles prepared by the Medical Social Worker and the amount spent for the respective patients along with the information

required to be sent under Rule 25 A of the Bombay Public Trusts Rules, 1951.

13. The Trustees of the charitable hospitals shall not provide medical facilities to their relatives, the employees of the Trust and their dependants in the category of "indigent and weaker section patients".

14. The Charitable Hospitals shall admit indigent or weaker section patients coming to their hospitals from any source or through Government Hospitals, Municipal Hospitals, etc. The procedure for admission of patients shall be as provided in subsequent clauses.

15. That the charitable hospitals shall admit indigent patients to the extent of 10% of their operational beds/average occupancy for medical examination and treatment. So also, the Charitable Hospitals shall admit weaker section patients to the extent of 10% of their operational beds/average occupancy for medical examination and treatment coming to their hospitals from the sources referred to in clause 14. The Charitable hospitals shall verify the economic status of the patients from their Medical Social Worker on the basis of scrutiny of any one of the following documents produced by the concerned patients: (i) Certificate from Tahasildar, (ii) Ration Card/Below Poverty Line Card.

16. The Members of the Monitoring Committee in Greater Mumbai Region shall be as follows:-

(i) Joint Charity Commissioner, Maharashtra State, Mumbai (Chairman).
(ii) Joint Director of Health Services (Medical), Mumbai (Member-Secretary).
(iii) Secretary/Nominee of Association of Hospitals in Mumbai (Member).
(iv) Health Officer, Municipal Corporation of Greater Mumbai, Mumbai (Member).

The Monitoring Committee at the District Level shall be as follows:-

(i) Joint Charity Commissioner (Regional Level) or his nominee (Chairman).

(ii) Civil Surgeon (Member-Secretary).

(iii) Health Officer of Zilla Parishad (Member).

(iv) Representative of Charitable Hospitals in Districts (Member).

17. The Monitoring Committee shall hold its meeting once in a month and monitor implementation of the Scheme by each of the Charitable Hospitals. The Monitoring Committee shall also consider grievances of the patients, if any, made and submit its report to the Charity Commissioner.

18. In case of the breach of the Scheme and / or the terms and conditions of section 41AA by any Charitable Hospitals, besides the penal action as is provided under section 66 of the B.P.T. Act, the Charity Commissioner shall make report to the State Government recommending withdrawal of the exemption granted to the concerned hospitals during the next preceding year in payment of contribution towards P.T.A. Fund and the amount of contribution towards P.T.A. Fund be recovered from the said hospital. The Charity Commissioner may also request the Government to withdraw any other concessions / benefits given to the said hospital.

19. The Charitable Hospitals which face individual difficulties in meeting objectives / obligations under this scheme shall be at liberty to apply to the Charity Commissioner with all supporting documents who may consider suitable modifications, if a case for relief is made out.

20.The Charity Commissioner shall notify the list of the Charitable Hospitals in Greater

Mumbai Region on the Notice Board of this office and two newspapers widely circulated in Greater Mumbai, one in Marathi and the other in English and the list of Charitable Hospitals in each District on the Notice Board of the office of the Joint Charity Commissioner and the two widely circulated newspapers of the District.

21. Each of the Charitable Hospitals governed by this Scheme shall publish the Scheme on its Notice Board displayed at a conspicuous place of the Hospital.

---------------------***---------------------

For more information kindly visit Charity Commissioner's office website charity.maharashtra.gov.in

असाधारण क्रमांक १३४
प्राधिकृत प्रकाशन
महाराष्ट्र शारानाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त)नियम व आदेश.

विधी व न्याय विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ फेब्रुवारी २०१८

अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विश्‍वस्त व्यवस्था अधिनियम

क्रमांक बीपीटी-१११७/प्र.क्र.३४/का.१५.- महाराष्ट्र सार्वजनिक विश्‍वस्तव्यवस्था अधिनियम, ( १९५० चा २९) याच्या कलम ४१ अ अ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ब) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत काढलेल्या मागील सर्व अधिसूचनाचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन उक्त अधिनियमाच्या कलम ४१ अ अ च्या प्रयोजनार्थ, ज्या व्यक्तीचे एकूण वार्षिक उत्पन्न हे पंचाऐंशी हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल , अशी व्यक्ती "निर्धन व्यक्तीं" असेल अशी मर्यादा याद्वारे विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नि.ज.जमादार
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated 23th February, 2018.

NOTIFICATION

**Maharashtra Public Trusts Act**

No. BPT-1117/CR-34/D. 15.- In exercise of the powers conferred by clause (b) of sub-section(4) of section 41 AA of the Maharashtra Public Trusts Act, (XXIX of 1950) and in supersession of all the previous notifications issued in this behalf, the Government of Maharashtra hereby specifies the limit that a person whose total annual income does not exceed Eighty-Five Thousand Rupees shall be an "Indigent person" for the purposes of section 41 A A of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N.J. Jamadar,
Principal Secretary and Remembrancer
of legal affairs to Government.

विधी व न्याय विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ फेब्रुवारी २०१८

अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम

क्रमांक बीपीटी-१११७/प्र.क्र.३४/का.१५.- महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, ( १९५० चा २९) याच्या कलम ४१ अ अ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ब) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत काढलेल्या मागील सर्व अधिसूचनाचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन उक्त अधिनियमाच्या कलम ४१ अ अ च्या प्रयोजनार्थ, ज्या व्यक्तीचे एकूण वार्षिक उत्पन्न हे एक लाख साठ हजार रुपयापेक्षा अधिक नसेल , अशी व्यक्ती "समाजातील दुर्बल घटकातील व्यक्ती" असेल अशी मर्यादा याद्वारे विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नि.ज.जमादार
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी

# LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 23th February, 2018.

## NOTIFICATION

**Maharashtra Public Trusts Act**

No. BPT-1117/CR-34/D. 15.- In exercise of the powers conferred by clause (b) of sub-section(4) of section 41 AA of the Maharashtra Public Trusts Act, (XXIX of 1950) and in supersession of all the previous notifications issued in this behalf, the Government of Maharashtra hereby specifies the limit that a person whose total annual income does not exceed One Lakh Sixty Thousand Rupees shall be the "person belonging to the weaker sections of the people" for the purposes of section 41 A A of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N.J. Jamadar,
Principal Secretary and Remembrancer
of legal affairs to Government.

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ३ जुलै २००९ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम.)

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;
आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १८ मे २००९ रोजी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २००९ प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी , उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १८ मे २००९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**2.** मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (यात यापुढे ज्याचा निर्देश १९५० चा "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ६६ ऐवजी, पुढील कलमे दाखल करण्यात येतील :-

"६६. जी कोणी व्यक्ती, खाली दिलेल्या तक्त्याच्या पहिल्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या कलमांपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला, अपराधसिध्दीनंतर अशा प्रत्येक अपराधाबद्यल, उक्त तक्त्याच्या तिस-या स्तंभात, त्याबाबतीत नमूद केलेल्या रकमेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

स्पष्टीकरण :- उक्त तक्त्याच्या दुसऱ्या स्तंभातील 'विषय' या शीर्षकाखाली दर्शविलेल्या नोंदी या, पहिल्या स्तंभात नमूद केलेल्या कलमात वर्णन केलेल्या अपराधाच्या व्याख्या म्हणून किंवा या कलमांचा सारांश म्हणूनही दिलेल्या नाहीत, परंतु, पहिल्या स्तंभात ज्यांचे क्रमांक दिलेले आहेत त्या कलमांच्या विषयासंबंधीचे केवळ निर्देश म्हणून त्यात समाविष्ट केल्या आहेत.

तक्ता

| कलम (१) | विषय (२) | बसविता येईल तो दंड (३) |
|---|---|---|
| | | रुपये |
| कलम १८, पोट-कलमे (१) व(४) | सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेची मुदतीच्या आत नोंदणी करण्यासाठी धर्मादाय उप-आयुक्तांकडे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे अर्ज करण्याचे विश्वस्तांचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम १८, पोट-कलम (७) | विवक्षित अधिकारी व प्राधिकारी यांच्याकडे स्थावर मालमत्तेसंबंधीचे ज्ञापन, मुदतीच्या आत पाठविण्याचे विश्वस्ताचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम २२ | बदलासंबंधी अहवाल पाठविण्यात कसूर करणे. | १०,००० |
| कलम २२ ख | तरतूद करण्यात आलेल्या मुदतीच्या आत, अर्ज करण्यात कसूर करणे. | १०,००० |
| कलम २२ ग | तरतूद करण्यात आलेल्या मुदतीच्या आत, ज्ञापन पाठविण्यात कसूर करणे. | १०,००० |
| कलम २९ | सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या नोंदणीसाठी तरतूद केलेल्या मुदतीत, अर्ज करण्यासंबंधीचे मृत्यूपत्र व्यवस्थापकाचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम ३२ | नियमितपणे लेखे ठेवण्यासंबंधीचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम ३५ | सरकारी रोख्यात पैसे गुंतविण्यात कसूर करणे किंवा ते न गुंतविणे. | १०,००० |
| कलम ५९ | (धर्मादाय आयुक्तांव्यतिरिक्त) विश्वस्ताने किंवा धर्मादाय रकमांची आकारणी करणा-या किंवा त्या वसूल करणा-या व्यक्तीने कलम ५८ अन्वये अंशदान देण्यात कसूर करणे. | १०,००० |

**६६** क. जो कोणी धर्मादाय आयुक्ताची पूर्वमंजूरी न घेता विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता अन्य संक्रमित करील किंवा तसे करण्याचा प्रयत्न करील त्याला कलम ३६ च्या तरतुदीचे उल्लंघन केल्यावरून अपराधसिध्दीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची शिक्षा किंवा पंचवीस हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**६६** ख. जो कोणी, कलम ४१ क क अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात, वाजवी कारणाशिवाय कसूर करील, त्याला अपराधसिध्दीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल अशा साध्या कारावासाची शिक्षा किंवा वीस हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील".

3. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये, "रू.१,०००" या मजकुराऐवजी, "रू.१०,०००" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः-

**"६७** क. (१) ज्यांच्या निदेशांन्वये तक्रार दाखल केली आहे असा सहायक धर्मादाय आयुक्तांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची कार्यवाही, एकतर ती सुरु करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, अशा अपराधासाठी दोषारोप ठेवलेल्या एखाद्या व्यक्तीकडून, त्याला योग्य वाटेल अशी अपराध आपसात मिटवण्याची रक्कम प्राप्त झाल्यावर, आरोपीच्या कसुरीचे स्वरूप, त्याचे पूर्व व विद्यमान वर्तन आणि अन्य संबध्द घटक लक्षात घेऊन, अपराध आपसात मिटविण्याकरीता, प्राधिकृत करील :

परंतु, अपराध आपसात मिटविण्याची रक्कम त्या त्या कलमांन्वये तरतूद केलेल्या द्रव्यदंडाच्या अधिकतम रकमेच्या एक चतुर्थांशापेक्षा अधिक नाही इतकी असेल.

(२)अशाप्रकारे अपराध आपसात मिटवून वसूल करण्यात आलेली रक्कम सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या प्रशासनिक निधीमध्ये जमा करण्यात येईल".

५. (१) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २००९ , हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कारवाई (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला कोणताही आदेश यांसह) ही, या अधिनिमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली कृती किंवा, यथास्थिती, कारवाई, किंवा काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

क्रमांक : ७०२/फ
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन मुंबई,
दिनांक : - १४ जानेवारी, २०२१

:: ज्ञापन ::

विषय : "धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीवर सदस्यांची नामनियुक्ती (२०२०-२०२१)

महाराष्ट्र विधानसभा नियम १६३ (१) अन्वये मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनाक ५ नोव्हेंबर, २०२० व दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी आणि महाराष्ट्र विधानपरिषद नियम १५८ (१) अन्वये मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी सन २०२०-२०२१ या वर्षासाठी "धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीवर अनुक्रमे महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या खालील सदस्यांची नामनियुक्ती केली आहे.

१) **श्रीमती आदिती तटकरे, मा. विधी व न्याय राज्यमंत्री तथा समिती प्रमुख**
२) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स.
३) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.
४) श्री. अजय चौधरी , वि.स.स.
५) श्री. रमेश लटके , वि.स.स.
६) श्री. बबनराव शिंदे , वि.स.स.
७) ॲड. अशोक पवार , वि.स.स.
८) डॉ. किरण लहामटे, वि.स.स.
९) श्री. धीरज देशमुख, वि.स.स.
१०) श्री. राजू पारवे, वि.स.स.
११) श्री. चंद्रकांत जाधव, वि.स.स.
१२) श्री. अतुल सावे, वि.स.स.
१३) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.
१४) श्री. बबनराव पाचपुते, वि.स.स.

१५) श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले, वि.स.स.

१६) डॉ. राहुल आहेर, वि.स.स.

१७) श्रीमती देवयानी फरांदे , वि.स.स.

१८) श्री. राहुल कुल, वि. स. स.

१९) श्री.प्रमोद पाटील, वि.स.स.

२०) श्री. अबू आजमी, वि. स. स.

२१) श्री. विप्लव बाजोरिया, वि. प. स.

२२) श्री. शशिकांत शिंदे, वि. प. स.

२३) डॉ. सुधीर तांबे, वि. प. स.

२४) डॉ. रणजित पाटील, वि. प. स.

२५) श्री. प्रविण पोटे पाटील, वि. प. स.

**श्रीमती आदिती तटकरे, मा. विधी व न्याय राज्यमंत्री या समितीच्या समिती प्रमुख राहतील.**

**(सायली कांबळी)**
अवर सचिव
उप सचिव (विधी) (अतिरिक्त)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

धर्मादाय रूग्णालयांमध्ये मोफत व सवलतीच्या दराने खाटा राखून ठेवण्याच्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हा स्तरावर समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग
क्र.लवेसु-२०१०/७३/(११)/का.पंधरा
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २२ जुलै, २०१०.

पार्श्वभूमी :- मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कमल ४१ क क अन्वये धर्मादाय रूग्णालयांमध्ये गरीब व निर्धन रूग्णांसाठी १० % +१०% खाटा सवलतीच्या दराने व मोफत राखून ठेवणे बंधनकारक आहे. सदर कलमातील तरतुदी तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेतील तरतुदींचे सर्व धर्मादाय रूग्णालयांनी पालन करणे आवश्यक आहे. तथापि, सदर योजनेची /तरतुदीची राज्यातील धर्मादाय रूग्णालयांकडून अंमलबजावणी योग्यरित्या केली जात नसल्याच्या तक्रारी मोठया प्रमाणावर शासनास प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने यासंदर्भात शासनाने आता पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :- मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कमल ४१ क क अन्वये धर्मादाय रूग्णालयांमध्ये गरीब व निर्धन रूग्णांसाठी १० % +१०% खाटा राखून ठेवण्याच्या योजनेची योग्यरित्या अंमलबजावणी होते किंवा कसे याबाबत सातत्याने पाहणी करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात जिल्हास्तरावर पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हाधिकारी | : समिती प्रमुख |
| २ | जिल्हयातील दोन मा. विधानसभा / परिषद सदस्य | : सदस्य |
| ३ | जिल्हा शल्यचिकित्सक | : सदस्य |
| ४ | सहायक धर्मादाय आयुक्त | : सदस्य |
| ५ | निवासी उपजिल्हाधिकारी | : सदस्य सचिव |

(कृ.मा.प.)

वरीलप्रमाणे प्रत्येक जिल्हयात समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागीय आयुक्त यांनी करावी.

सदर समितीने त्यांचा अहवाल प्रत्येक तीन महिन्यांनी संबंधित विभागीय आयुक्त यांना सादर करावा व त्याची प्रत शासनास सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(एस.एम.कोल्हे)
विधी सल्लागार-नि-सह सचिव

मुंबई विश्वस्त कायद्यांतर्गत नोंदणीकृत
रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी तपासणी समिती
व उच्चधिकार समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक धसंरु-२०१२/प्र.क्र. ३८९/आरोग्य-६
दिनांक १९ नोव्हेंबर २०१२

**शासन निर्णय**

मुंबई विश्वस्त कायद्यांतर्गत नोंदणीकृत संस्थांच्या रुग्णालयांना शासनाकडून विविध सवलती दिल्या जातात. सदर सवलतीच्या अनुषंगाने सदर रुग्णालयांनी गरीब व आर्थिकदृष्ट्या कमकुवत रुग्णांना उपचार उपलब्ध करून देण्यासाठीच्या योजनेंतर्गत सदर रुग्णालयांनी उपलब्ध करून दिलेल्या उपचारांची गुणवत्ती, दर्जा व आराराप्रमाणे अपेक्षित चाचण्या व उपचार झाले असल्याची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहेः-

| | | |
|---|---|---|
| १. | सह धर्मादाय आयुक्त | अध्यक्ष |
| २. | सहायक संचालक, आरोग्य सेवा | सदस्य सचिव |
| ३. | मुख्य वैद्यकीय अधिकारी / प्रतिनिधी महानगरपालिका | सदस्य |
| ४. | सहायक विक्रीकर आयुक्त | सदस्य |

सदर तपासणी समितीने धर्मादाय संस्थांच्या रुग्णालयांनी या योजनेंतर्गत उपचार केलेल्या अभिलेखांची त्रैमासिक तपासणी करावी. तपासणी करताना रुग्णांचे केसपेपर, रुग्णांवर केलेल्या संबंधित चाचण्या आवश्यक होत्या काय, सदर चाचण्यांसाठी आकारलेला खर्च वाजवी आहे किंवा नाही तसेच रुग्ण आर्थिकदृष्ट्या कमकुवत किंवा गरीब असल्याबाबतचे प्रमाणपत्र इत्यादीची तपशीलवार तपासणी करावी. याशिवाय रुग्णालयांचा आय. पी. एफ. फंड व त्यातून झालेला खर्च यांचीही तपासणी करणे आवश्यक आहे. (सोबत तपासणी नमुना जोडला आहे)

सदर तपासणी समितीने आपला अहवाल खालीलप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीस सादर करावा.

| | |
|---|---|
| अपर मुख्य सचिव, आरोग्य | अध्यक्ष |
| प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी<br>राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई | सदस्य |
| धर्मादाय आयुक्त | सदस्य |
| विक्रीकर आयुक्त | सदस्य |
| संचालक आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य |
| उप-सचिव, आरोग्य-६ | सदस्य सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. सं. फडतरे,**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

महाराष्ट्र विश्वस्त कायद्यांतर्गत नोंदणीकृत धर्मादाय रुग्णालयांकडून गरीब व दुर्बल रुग्णांवर केलेल्या उपचारांची गुणवत्ता, आकारलेले दर इत्यादी बाबींची तपासणी करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांची समिती नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय, क्रमांक : बीपीटी -२०१२/ प्र.क्र.७८/१२/का.१५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक : - २८ मे, २०१४.

प्रस्तावना : महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० मधील कलम ४१ क क मधील तरतूदीअंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेनुसार धर्मादाय रुग्णालयांमध्ये एकूण कार्यान्वित असलेल्या खाटांच्या संख्येपैकी निर्धन रुग्णांसाठी १०% खाटा मोफत वैद्यकीय उपचाराकरिता व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी १०% खाटा सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचाराकरिता आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. तथापि, सदर योजनेची राज्यातील धर्मादाय रुग्णालयांकडून अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याच्या तक्रारी मोठया प्रमाणावर शासनास प्राप्त होत असतात. तसेच विधानमंडळामध्येही सदर विषय वेळोवेळी उपस्थित केला जातो. त्याअनुषंगाने धर्मादाय रुग्णालयांकडून योजनेची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात येत आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांची समिती गठित करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. यासंदर्भात शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :- महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१क क मधील तरतुदीअंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेनुसार धर्मादाय रुग्णालयांकडून गरीब व दुर्बल घटकातील रुग्णावर उपचार करताना येणाऱ्या अडचणी, रुग्णावर केलेल्या उपचाराची गुणवत्ता, उपचारासाठी आकारण्यात येणारे दर, औषधांचे दर या व अनुषंगिक इतर सर्व महत्वाच्या बाबींची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे तज्ञ डॉक्टरांची समिती गठित करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) डॉ. तात्याराव लहाने | - अध्यक्ष |
| २) डॉ. अनिरुध्द धर्माधिकारी | - सदस्य |
| ३) डॉ. संजय ओक | - सदस्य |
| ४) डॉ. प्रमोद लेले | - सदस्य |
| ५) डॉ. निलीमा क्षिरसागर | - सदस्या |
| ६) डॉ. अनंत फडके | - सदस्य |

२. सदर समिती धर्मादाय रुग्णालयांकडून निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर योजनेनुसार उपचार करण्यासाठी खाटा राखून ठेवण्यात येतात किंवा कसे, रुग्णांस दाखल करुन घेतल्यानंतर रुग्णांच्या आजारानुसार त्यांच्यावर करण्यात येणारे उपचार, त्याची आवश्यकता, त्याची गुणवत्ता व दर्जा तसेच रुग्णांवर करण्यात आलेल्या चाचण्याचे दर, उपचाराचे शुल्क, औषधांचे दर इत्यादी महत्वाच्या बाबींसाठी आकारण्यात आलेले दर उचित व योग्य होते किंवा कसे यांची तपासणी करुन तपासणीचा त्रैमासिक शिफारस वजा अहवाल धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत शासनास उपलब्ध करुन देतील.

३. धर्मादाय आयुक्त तज्ञ डॉक्टरांच्या समितीच्या शिफारस अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करून त्यांच्या शिफारशीसह उचित प्रस्ताव शासनास सादर करतील.

४. तज्ञ डॉक्टर समितीच्या धर्मादाय रुग्णालयाच्या तपासणीसाठी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी नियुक्ती केलेला प्रतिनिधी समितीस आवश्यक ती मदत व सहाय्य करतील.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.सो.शिंदे)
विधि सल्लागार नि सह सचिव,
विधि व न्याय विभाग.

# सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बृहन्मुंबई विभाग, मुंबई

| अ. क्र. | धर्मादाय रुग्णालयाचे/ वैद्यकिय केंद्राचे नाव व पत्ता | रुग्णालयातील एकूण कार्यान्वित खाटांची संख्या | निर्धन घटकातील रुग्णाकरीता राखीव खाटांची संख्या | दुर्बल घटकातील रुग्णाकरीता राखीव खाटांची संख्या | संपर्क १)वैद्यकिय समाजसेवक नाव व फोन नं. २)रुग्णालयाचे फोन नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि बांद्रा होली फॅमीली हॉस्पिटल सोसायटी, सेंट अॅन्ड्र्यूज रोड, वांद्रे (प), मुंबई-४०० ०५० | २६८ | २७ | २७ | १. श्रीमती लिडिया सेक्यूरिया<br>२. श्रीमती रेवती शेट्टी<br>मो.नं-७७३८६२४९२६<br>०२२-६२६७०५५५ |
| २ | डॉ. बालाभाई नानावटी हॉस्पिटल, एस. व्ही. रोड, विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०५६ | ३३५ | ३५ | ३५ | श्रीमती स्वाती घाईतडके<br>मो.नं.७७३८६२१५७२<br>०२२ – ६१३४७६२४ / ७९९३ |
| ३ | भारतीय आरोग्य निधी, शेठ के. सी.पारीख जनरल हॉस्पिटल, एन. एस. रोड नं १३,जुहू, विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०४९ | ७० | ७ | ७ | १.श्री. अजय पनीकर<br>०२२-२२६१७४३३<br>०२२-२६२०६०२१,२६२०६४९३ |
| ४ | दि भाटिया जनरल हॉस्पीटल, तुकाराम जावजी रोड, ताडदेव,ग्रॅन्ट रोड (प), मुंबई ४०० ००७ | १०० | १० | १० | १.श्री. गोर्धन सिंग तन्वर<br>०२२ -६६६६००००/४७६<br>मो.नं.९३२२३३५४९९ |
| ५ | दि बोमनजी दिनशा पेटीट पारसी हॉस्पिटल, बोमनजी पेटीट रोड, कंबाला हिल, मुंबई ४०० ०३६ | २२० | २२ | २२ | १. Mr. Hormazd Chesan<br>९९२००८३९०१<br>०२२-६११८६११८ |
| ६ | दि बॉम्बे हॉस्पिटल ट्रस्ट, १२ मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२० | ७०१ | ७१ | ७१ | १.डॉ. आर. के चौधरी, (सिनियर मेडिकल सुपरिटेंडेट)<br>मो.न-९८२०६२८०४६<br>०२२ -२२०६७६७६ . |
| ७ | ब्रीच कॅन्डी हॉस्पिटल, ६०-ए, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ | २०२ | २० | २० | १.श्रीमती. रोविना<br>०२२–२३६६७१८०/२३६६७७८८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | बी. एस. ई. एस. एमजी हॉस्पिटल, एस. व्ही. रोड, अंधेरी (प), मुंबई-४०० ०५८ | ११० | ११ | ११ | १.श्री. निलेश नेरुरकर<br>मो.नं-९९६९६५०९५३<br>०२२-६६४८७६३१ / ६३२ |
| ९ | कॉन्वेस्ट ॲण्ड मंजुला एस.बदानी जैन हॉस्पिटल, ८/१०, एस.व्ही सोवनी पेठ निकदवरी लेन, खाडीलकर रोड, गिरगांव मुंबई-४०० ००४ | ९४ | ९ | ९ | १.श्रीमती प्रगती आंनद टिळक<br>मो.नं -९५९४४०११२४<br>२.श्री. इंद्रनिल बेलोसे<br>मो.नं-९१३६३९६०८१<br>०२२- २३८२०९०९ |
| १० | धन्वंतरी हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च, डी. एल. वैद्य रोड, शिवाजी पार्क, दादर (प.), मुंबई ४०० ०२८. | ५३ | ५ | ५ | १.श्री. अतुल पेठे<br>(एम.एस.डब्ल्यू)<br>०२२-२४३०५६६४/२४३०४०८२<br>मो.नं.-९८९२६३४६८०<br>२.सुयशा धारप<br>मो.नं-.९९२०६४३४६७ |
| ११ | एस. एल. रहेजा हॉस्पिटल, रहेजा हॉस्पिटल रोड, माहिम, मुंबई – ४०० ०१६. | १५४ | १५ | १५ | १.श्री.विनित देव<br>(एम.एस डब्ल्यु)<br>मो.नं-९८७००७७४५६<br>०२२ – ६६५२ ९९९९ / ९६१९ |
| १२ | सेंट एलीझाबेथ हॉस्पिटल, जे मेहता रोड, मलबार हिल, मुंबई – ४०० ००६. | १०० | १० | १० | १.सिस्टर गोरेटी<br>(एम. एस डब्ल्यु)<br>मो.नं-९७६९९००९९८<br>६१४५२१४५/५४/०६/०७/५०/४०. |
| १३ | श्री आयुर्वेद प्रचार संस्थेचे श्रीमती कमलादेवी गौरीदत्त मीत्तल आयुर्वेदिक हॉस्पिटल, नेताजी सुभाष रोड, चर्नीरोड, मुंबई- ४०० ००२. | १०० | १० | १० | १. वैदय,मनिष म. सावंत - (RMO)<br>मो.नं-९६१९३४४८४९<br>२२८१२८१८ / २२८१३७६७. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | गुरु नानक क्विनेटेन्सी मेमोरियल हॉस्पिटल, व्दारा श्री एस साच सिंग, गुरुमुख सिंग,प्लॉट नं. ३४९, कला नगरजवळ, बांद्रा, मुंबई – ४०० ०५१ | १२० | १२ | १२ | १.श्रीमती. वैशाली इंगोले(एम.एस.डब्ल्यू) ०२२-४२२२७७६९ / ४२२२७७७७ Email Id msw@gurunanakhospital.com, info@gurunanakhospital.com |
| १५ | के बी हजी बच्चुअली चॅरिटेबल ऑफथॉल्मीक ॲन्ड इ एन टी हॉस्पिटल, ५८/६०, जहांगीर मेरवानजी स्ट्रीट, परेल, मुंबई-४०० ०१२. | ४५ | ५ | ५ | १.श्री. रोहित खुडे (एम.एस.डब्ल्यू) मो.नं-९६६४२३२५८२ २.मिसेस. सिल्विया गोन्साल्विस मो.नं-९०४९२९१५८२ ०२२-२४१३११९० / २४१४६५६७ |
| १६ | हरिलाल जेचंद जोशी घाटकोपर हिंदु सभा हॉस्पिटल, मेडिकल एड फंड, श्रध्दानंद रोड, घाटकोपर रेल्वे स्टेशनच्या समोर ,घाटकोपर, मुंबई-४०० ०८६. | १४५ | १४ | १४ | १.श्री. आनंद शाहूजी सावते (एम. एस डब्ल्यु) मो.नं-८०८०३३८५०५ ०२२-६८३४१४१४ Extn १६७ ०२२-२५०९४४५१ / ५२ / ५३/ ५४ |
| १७ | हबीब हॉस्पिटल ,१५९, जेल रोड (पू.),बाल गृहासमोर , इमाम हुसेन चौक जवळ, डोंगरी, मुंबई-४०० ००९. | ७२ | ७ | ७ | १.श्रीमती. मिनल ठाकोर(एम.एस.डब्ल्यू) मो. न.-९८२०३४३२७८ ०२२-२३७८८१३० ०२२ - २३७५७५७३ |
| १८ | एल एच हिरानंदानी हॉस्पिटल, हिल साईड ॲव्हेन्यू हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई-४०० ०७६. | २४४ | २४ | २४ | १.श्री. योगेश पाटील (एम. एस डब्ल्यु) ०२२-२५७६३३९९ मो.नं-९०८२६२३७०७ |
| १९ | होली स्पिरीट हॉस्पिटल, महाकाली केव्हज रोड, अंधेरी, (पू.), मुंबई ४०० ०९३. | ३०० | ३० | ३० | १.श्री. किसन पवार मो.नं-९६६४६५५५९६ २. श्री. जस्टिन जेम्स ०२२-२८२४८५०० (एम. एस डब्ल्यु) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | सर एच.एन.रिलायंस फौंडेशन (हरकिसनदास नरोत्तमदास) हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर, पदमश्री गोर्धन बाप्पा चौक, राजाराम मोहन रॉय रोड, गिरगाव,मुंबई-४०० ००४. | २४० | २४ | २४ | १.श्रीम.दिपाली चौहान मो.नं-८२९१६६१९८० २.मिस.जयश्री ठाकूर (एम.एस डब्ल्यु) मो. नं.८७७९८५७६८४ ०२२-६१३०५३९४ / ६१३०५३९५ |
| २१ | इनलॅक्स जनरल हॉस्पिटल, इनलेक्स हॉस्पिटल रोड, चेंबुर कॉलनी, मुंबई ४०० ०७४. | ९४ | ९ | ९ | १.रेशमा मुर्थजा- ०२२-२५५२८००० ext-३९४ |
| २२ | जसलोक हॉस्पिटल , १५, डॉ. जी देशमुख मार्ग, पेडर रोड,मुंबई-४०० ०२६. | ३४४ | ३४ | ३४ | श्री.रमाकांत धस मो.नं-७३०४५१५४५२ ०२२-६६५७ ३३३३ ०२२-६६५७३०११ |
| २३ | करुणा मेडीकल सोसायटी, करुणा हॉस्पिटल, जीवन विमा नगर, बोरिवली (प.), मुंबई ४०० ०१३. | १५६ | १६ | १६ | १.श्रीमती पुनम याग्नीक मो. नं. ७०४५५९६७०९ ०२२-६१५९४६९८ |
| २४ | लायन ताराचंद बाप्पा हॉस्पिटल अॅन्ड सेंटर, जैन सोसायटीच्या बाजुला, सायन (प.), मुंबई-४०० ०२२. | ६५ | ७ | ७ | १.श्रीमती अपुर्वा गाडे मो.नं- ८८७९७९९८९० ०२२-२४०९२४६४ |
| २५ | लिलावती हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, ए-७९१, बांद्रा रेक्लमेशन,बांद्रा (प.), मुंबई-४०० ०५० | २६० | २६ | २६ | १.श्रीमती दिपा शिंदे (एम.एस.डब्ल्यू) ०२२-२६५६ ८३६१ ०२२-२६५६-८००० ०२२-२६७५-१००० |
| २६ | मसीना हॉस्पिटल ट्रस्ट, संत सावता माळी मार्ग, भायखळा, (पु)मुंबई ४०० ०२७. | २७० | २७ | २७ | १.श्री. चारुदत्ता वैद्य ०२२- ६१८४९२५१ ०२२- २३७१४८९० Ext- २५१ |
| २७ | मगनलाल पोपटलाल चॅरिटी अॅन्ड सर्वोदय हॉस्पिटल ट्रस्ट, रायफल रेंज, एल. बी. एस. मार्ग, घाटकोपर (प.), मुंबई ४०० ०८६. | ८० | ८ | ८ | डॉ. एन. एस. नागराजन मो.नं. ९८६७३८१४७६ ०२२-२५१५२३३२/२५१५२२३७/ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ | श्रीमती मोतीबेन बी दळवी हॉस्पिटल,३८ज्ञानमूर्ती सिताराम पाटकर,गांवदेवी, मुंबई-४०० ००७. | ५७ | ६ | ६ | १.श्रीमती.शितलसुर्वे -(एम.एस.डब्ल्यू) मो.नं. ९९६७३४१८०४<br>०२२-२३६३४६१८ / ०३५७<br>०२२-२३६८१६२९ / ३८१७ |
| २९ | पी डी हिंदुजा हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर. (दि नॅशनल हेल्थ ॲन्ड एज्युकेशनल सोसायटीचे,) वीर सावरकर रोड, माहिम, मुंबई-४०० ०१६. | ३७३ | ३७ | ३७ | १.श्री. जे.व्यकंट<br>२.श्रीमती कल्पना लाड<br>३.श्रीमती चंद्रा उपाध्याय<br>४.श्रीमती अंजली पाटील<br>मो.नं. (PRD) -<br>८६५७९९७४६३<br>२४४४७५३५/२४४४७५३६ (PRD) |
| ३० | नुर हॉस्पिटल ट्रस्ट. ४९, मोहमद अली रोड, नूर हॉस्पिटल इमारत, मुंबई-४०० ००३. | ९२ | ९ | ९ | १.श्रीमती विनया निलेश पाताडे (सोशलवर्कर)<br>मो.नं.- ९५३७६९८१४४<br>०२२-६७८७१११ |
| ३१ | दि पीपल्स मोबाईल हॉस्पीटल्स, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८. | OPD | | | १.श्रीमती. मानसी माडे -संपर्क व्यक्ती<br>२४९३ ३७९२ / २४९३३७५९ |
| ३२ | प्रिन्स अली खान हॉस्पिटल, आगा हॉल, नेसबेट रोड, माझगाव ,मुंबई-४०० ०१०. | १५६ | १६ | १६ | १.श्री. फरान अमीर अली जीवानी<br>-(एम.एस.डब्ल्यू)<br>मो.नं-९९३०४५०१४७<br>०२२-२३७७ ७८०० |
| ३३ | बाई जेरबाई वाडिया हॉस्पिटल फॉर चिल्ड्रन, आचार्य दोंदे मार्ग, परेल, मुंबई-४०० ०१२. | ३८७ | ३९ | ३९ | १.श्री. मयुरेश रोडगे<br>मो.नं.-९६६५९५४६६६<br>२) मिस दिव्या टपारीया<br>मो.नं-९३२४२१७६९०<br>३) मिस सुमिता सुर्वे (एम.एस.डब्ल्यू)<br>मो.नं-९५०३२७०७१७<br>४) श्री. सत्यजित सुरवाडे<br>मो.नं.-९०२२८८९३१२<br>५)श्रीमती अस्मिता लोंढे<br>मो.नं-८१६९८७०२९२, ०२२-२४१९७३००/०२२-२४१९७२०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | दि नवरोजजी वाडिया मॅटर्निटी हॉस्पिटल, आचार्य दोंदे मार्ग, परेल, मुंबई-४०० ०१२. | ३०५ | ३१ | ३१ | १. नुपूर चौधरी<br>मो.नं-९८३३९५९७७०<br>०२२-२४१४६९६४ / ६५ / ६६. |
| ३५ | दि सैफी हॉस्पिटल ट्रस्ट, पोस्ट बॉक्स नं.३७७१, १५/१७, महर्षी कर्वे मार्ग, चर्नीरोड रेल्वे स्टेशन समोर, मुंबई-४०० ००४. | २१५ | २१ | २१ | १.मोनालिसा परेरा<br>०२२-६७५७०२०९ |
| ३६ | के. जे. सोमय्या हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, आयुर्विहार, एव्हरार्ड नगरजवळ, पूर्व द्रुतगती मार्ग, सायन, मुंबई-४०० ०२२. | ४५५ | ४५ | ४५ | १) के. एन. गायत्री<br>(एम. एस डब्ल्यु)<br>मो.नं-९८३३३२११८३<br>२.भारती हेलगे<br>मो.न-९३२४४४२००१<br>०२२-५०९५४७०० |
| ३७ | सुश्रुत हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, अ युनिट ऑफ चेंबुर हॉस्पिटल प्रोजेक्ट ट्रस्ट.३६५, स्वस्तिक पार्क, चेंबूर (पू.), मुंबई-४०० ०७१. | ८६ | ९ | ९ | १.श्रीमती.तृप्ती शिंदे<br>(एम.एस.डब्ल्यू)<br>मो.नं-९९२०१३२००७<br>०२२-२५२६५५०० |
| ३८ | श्रीमती सुशिलाबेन आर मेहता ॲण्ड सर किकाभाई, प्रेमचंद कार्डियाक इन्स्टीट्यूट, प्लॉट नं. ९६, रोड नं. ३१, गांधी मार्केट जवळ, सायन माटुंगा (पू.), मुंबई-४०० ०२२. | ७२ | ७ | ७ | १.श्री.मनोहर चंदी रमानी<br>(एम.एस.डब्ल्यू)<br>९८२०२६०९०३, ०२२-२४०३५४/५५/५७<br>ext-२५५ |
| ३९ | ब्राम्हण सभा मुंबई म्हसकर सुतिका गृह व जनरल नर्सिंग होम,डॉ.डी.डी.साठेमार्ग, (बणाम हॉल लेन )राजा राममोहन रॉय रोड, गिरगांव, मुंबई-४०० ००४. | ४१ | ४ | ४ | १.श्रीमती मानसी राजेश कीर<br>(ॲडमेनिस्टेटिव्ह ऑफिसर)<br>मो.नं-८७७९७८२१४०<br>२३८६४८६२ , २३८७१९९९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४० | श्रीराम एक धर्मदा ट्रस्ट रुक्षमणी लाईंग इन हॉस्पिटल, ऑबस्ट्रीक ॲण्ड गायनेंक आऊट डोअर डिपार्टमेंट, ९, बाबुलनाथ रोड, मुंबई-४०० ००७ | ३७ | ४ | ४ | १.श्री.एस.एस. राजन मो.नं-९८६७९३१४८३ ९३२६०२१४९० ०२२-२३६३११८३ |
| ४१ | श्री. के. व्ही. ओ. जैन मानव सेवा केंद्रचे नवनीत हॉस्पिटल, मानव कल्याण केंद्र,दहिसर फाटकजवळ, एल.टी. रोड,दहिसर (पू.), मुंबई-४०० ०६६. | ८२ | ८ | ८ | १.श्री संतोष झा . (एन.एस.डब्ल्यू) मो.नं-९००४३५५३३३, ०२२-२८९३५८५८ Ext. - १०६ |
| ४२ | श्री. कांदिवली हितवर्धक मंडळ, केएचएम हॉस्पिटल, श्री. मनगुभाई दत्तानी भवन, एस. व्ही. रोड/ एस. एम. रोड, कॉर्नर, कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७. | ४८ | ५ | ५ | १.श्री.गोविंद राठोड मो. नं. - ९३२०५०८०८२ ०२८०२१०७३ / ०२८०७२८९८ / ०२८०७८६५७ |
| ४३ | होमिओपॅथिक एज्युकेशन सोसायटीचे, श्री मुंबादेवी होमिओपॅथिक हॉस्पिटल,नाटककार आर. जी. गडकरी मार्ग, , विलेपार्ले (प.), मुंबई-४०० ०५८. | २५ | ३ | ३ | १.श्री. रमेश कलाम्बते मो.नं-७७१५०४००५६ २६२४५०९९ / २६२०४०४५ |
| ४४ | लोटस आय हॉस्पिटल (लोटस ऑस्पीटल ट्रस्ट), १३ वा रस्ता, विठ्ठलनगर सोसायटी ,जुहू बस टर्मिनस,जुहू मुंबई-४०००४९ | ५० | ५ | ५ | १.श्रीमती. तेजल मुरकर (एम.एस.डब्ल्यू) ९७६९८६९८९८, २६२०७५३२ |
| ४५ | जीवन विकास केंद्र (सदानंद दणाईत हॉस्पिटल), समोर स्वामी नित्यानंद मार्ग, सहार रोड, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०६९. | ६२ | ६ | ६ | श्री. विजय मेनन मो. नं-९८२०२२३७१८ श्री. दिगंबर लोखंडे मो.नं. ९८९२५७२९७६ ०२२-२६८४३२३५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
